# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २४/०७/२०१९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २४/०७/२०१९ रोजी सभा सुचना क्र. ०६ दि. २१/०७/२०१९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. पिठासीन अधिकारी श्री. रवि व्यास हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्यास रवि वासुदेव | सभापती |
| २. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४. | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | सदस्य |
| ५. | श्री. राजीव मेहरा | सदस्य |
| ६. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७. | श्रीम. वर्षा गिरधर भानुशाली | सदस्या |
| ८. | श्री. राकेश रतिशचंद्र शाह | सदस्य |
| ९. | श्रीम. निला बर्नाड सोन्स | सदस्या |
| १०. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ११. | श्रीम. दिप्ती शेखर भट्ट | सदस्या |
| १२. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |
| १३. | श्रीम. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १४. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १५. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. २४/०७/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय , दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०६ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे**. प्रकरण क्र. ३७, **दि. ११/०६/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**राकेश शाह :-**

दि. ११/०६/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब आपण इतिवृत्तांताला मान्यता देतो. त्याच्यात बऱ्याच सुचना देतो. त्याचे अनुपालन कुठे आहे.

**नगरसचिव :-**

अनुपालनमध्ये काय अपेक्षा आहे.

**जुबेर इनामदार :-**

सभापती महोदय ब-याच विषयामध्ये अधिका-यांना सुचना करतात की अशाप्रकारे कारवाई करा ह्याच्यामध्ये काय रद्दबदल केला जातो. ह्यांचा अहवाल पुढच्या सभेमध्ये सादर करा असे ब-याच वेळेला सांगतात. परंतु अहवाल कधीच आला नाही.

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब ह्याची तुम्ही नोंद घ्यावी आणि संबंधित विभाग प्रमुखाला तुम्ही सांगा. आम्ही ज्या सुचना देतो त्याचे अनुपालन आले पाहिजे. ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ३७ :-**

**दि. ११/०६/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ३४ :-**

दि. ११/०६/२०१९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३८, **भाईंदर (पूर्व) आर.एम.पी. पार्क कोळीनगर येथील शौचालय तोडणेबाबत.**

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय विषय विरोधात नाही. परंतु गोषवा-यात दिलेले आहे. सदर शौचालयाचा भाग पाठीमागून झुकलेला दिसून येत आहे. शौचालय तयार होऊन किती वर्ष झाली. एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून किती शौचालय प्राप्त झाली होती.

**दिपक खांबित :-**

१३०.

**जुबेर इनामदार :-**

आपण किती बांधले. सध्या किती अस्तित्वात आहेत. १३० आहेत की त्याच्यातले आपण काही तोडले का? २००८ पासून ह्याच्यामागे दुरुस्तीचा खर्च पण झाला आहे.

**दिपक खांबित :-**

वर्षाला २५ हजार खर्च होतो.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे २००८ पासून ३ कोटी वर्षाला खर्च केले. गोषवा-यामध्ये प्रशासन स्वतः देते बाजू झुकलेली आहे. २००८ ते २०१९ दहा वर्षात बांधकाम खल्लास झाले. सिमेंट नव्हतं तेव्हापासूनच्या इमारती मुंबईमध्ये आहेत. १००-१५० वर्षाच्या इमारतीना काही झाले नाही. मिरा भाईंदरची भौगोलिक परिस्थिती खारपट जमीन जरी असली तरी ४०-५० वर्ष तरी इमारत टिकते. भाईंदरच्या इमारती आहेत ना वार्षिक ३ कोटी खर्च करते. खाडी किनारी बरेच काही आहे. १० वर्षामध्ये सगळेच जाईल. ह्या विषयावर माहिती द्या असे कसे बांधकाम ठेकेदार करतात जे १० वर्षात मोडकळीस आले. त्यांनी पाया भरलेला तोच झुकला. हा विषय जाणून बुझून चर्चेला आणला. मला ह्याच्यावर तुम्ही केलेला चौकशी अहवाल पाहिजे. १३० शौचालय बांधले आहेत. त्याची सध्याची काय परिस्थिती आहे शासनाचा पैसा आहे.

**दिपक खांबित :-**

आपण स्वतः तिकडे व्हिजीट करु.

जुबेर इनामदार :-

कधी जायचे ते तुम्ही सांगा.

राकेश शाह :-

**भाईंदर (पूर्व) आर.एम.पी. पार्क कोळीनगर येथे महानगरपालिकेचे शौचालय आहे . सदर शौचालय तळ अधिक एक मजल्याचे आहे. सदर शौचालय 17 शिट्स चे असून 2 बाथरुम आहेत.**

**सदर शौचालयाचा पाठीमागचा भाग झुकलेला दिसुन येत आहे . सदर शौचालय तोडुन सदर ठिकाणी मार्केट तात्पुरते मार्केट बांधावयाचे आहे . आर.एम.पी. पार्क कोळीनगर येथे नविन 5 गाळयाचे शौचालय बांधण्यास मा . महासभा दि. 07/06/2019 ठराव क्र. 15 अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिलेली आहे . तरी जुने शौचालय तोडणेकरीता ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

श्रीप्रकाश सिंह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

प्रकरण क्र. ३८ :-

**भाईंदर (पूर्व) आर.एम.पी. पार्क कोळीनगर येथील शौचालय तोडणेबाबत.**

ठराव क्र. ३५ :-

**भाईंदर (पूर्व) आर.एम.पी. पार्क कोळीनगर येथे महानगरपालिकेचे शौचालय आहे . सदर शौचालय तळ अधिक एक मजल्याचे आहे. सदर शौचालय 17 शिट्स चे असून 2 बाथरुम आहेत.**

**सदर शौचालयाचा पाठीमागचा भाग झुकलेला दिसुन येत आहे . सदर शौचालय तोडुन सदर ठिकाणी मार्केट तात्पुरते मार्केट बांधावयाचे आहे . आर.एम.पी. पार्क कोळीनगर येथे नविन 5 गाळयाचे शौचालय बांधण्यास मा . महासभा दि. 07/06/2019 ठराव क्र. 15 अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता दिलेली आहे . तरी जुने शौचालय तोडणेकरीता ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. राकेश शाह　　　　अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३९, **मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. ०३ उद्यानामधील विनावापर असलेले शौचालय तोडणेबाबत.**

मोहन म्हात्रे :-

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) शांतीनगर सेक्टर नं .3 उदयानामध्ये निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत मार्फत सन 2006 मध्ये सार्वजनिक शौचालय बांधण्यात आलेले आहे . सदरचे शौचालय हे तळ + 1 मजल्याचे आहे. सध्या सदरच्या शौचालयाचा वापर होत नाही तसेच शौचालयचा स्लॅब खराब झालेला असुन त्या मधुन गळती होत आहे , भिंती खराब झालेला आहेत त्यामुळे सदरचे शौचालय हे धोकादायक बनलेले आहे. तसेच सदरच्या शौचालयाचा वापर गर्दुले चरसी लोकांचा अड्डा बनलेला आहे . तसेच याबाबत बाजूच्या गृहनिर्माण सोसायटींनी सुध्दा तक्रारी केलेल्या आहेत. तरी सदरचे शौचालय तोडणेस, ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

श्रीप्रकाश सिंह :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर.

**जुबेर इनामदार :-**

सभापती परत तोच विषय आयुक्त साहेब आपले लक्ष वेधू इच्छितो. गळती लागली बांधकाम तूटते बांधकाम मोडीस आले आहे. २५००० त्याच्यामागे वर्षाला खर्च होतो म्हणजे पालिकेचे ३ कोटी खर्च करत होते. करदात्याचा पैसा खर्च करत होते. १० वर्षात बांधकाम मोडकळीस आले म्हणजे सर्वच आले असतील. ह्याचा आम्हाला अहवाल पाहिजे.

**दिपक खांबित :-**

तिकडे सेक्टर ४ ची जी गार्डन आहे. ती आपण दोन भागामध्ये एकत्र करायला लावली आहे. शौचालयमध्ये नडले म्हणून नगरसेवक निधीतून नविन बांधकाम करायला लावले आहे. ३-४ मध्ये दोन्ही ठिकाणी मोठ्या शौचालयाची गरज नाही ते मध्ये झाले आहे. अगोदर मोकळी जागा होती.

**दिप्ती भट :-**

नगरसेवक खान साहेब होते. पब्लिकला विचारले नाही आणि त्यांनी तीन मजले बांधले आहेत. चार फुट बिल्डींगची जागा आहे. ४ फुट विंडो आणि तुम्ही ३ माळ्याची इमारत न विचारता बांधता त्या नगरसेवकाची चूकी आहे. त्यांनी पब्लिकला विचारायला पाहिजे होते. तुम्ही ते स्लममध्ये बांधायचे होते ते तुम्ही त्याच्यात बांधले न परमिशन घेता बांधले आहे. आम्ही गार्डन पुरते छोटे तिकडे बांधून देऊ ते तुम्ही तोडा.

**जबेर इनामदार :-**

आम्ही फक्त तुम्ही केलेले सत्यप्रवचन आहे. वस्तूस्थिती आहे त्याच्यावर विषय चालला आहे. बांधकामाची अशी परिस्थिती का? सार्वजनिक बांधकाम विभागाने बांधकामाचे ऑडिट केले असेल.

**दिपक खांबित :-**

केले सर्व टॉयलेटचे केले.

**जुबेर इनामदार :-**

पालिकेच्या मालमत्तेचे ऑडिट किती वर्षाने होते.

**दिपक खांबित :-**

फस्ट टाईम केले.

**जुबेर इनामदार :-**

ऑडिट कधी झाले आहे.

**दिपक खांबित :-**

दोन महिन्यामध्ये केले. आपल्या पॅनल वरची लोक आहेत. त्यांना सगळ्यांना नेमून दिले होते आणि सगळ्यांनी केले.

**जुबेर इनामदार :-**

ऑडिटचा अहवाल आम्हाला सादर करा. बरीच नविन बांधकाम केले आरक्षणामध्ये मोठमोठे हॉल उभे केले आहेत असे झाले तर १० वर्षात सर्वच मोडकळीस येतील.

**दिपक खांबित :-**

मी शौचालयाचे बोललो बाकीचे ३० वर्षाचे असते.

**जुबेर इनामदार :-**

शौचालयाचे महत्व नसते का?

**दिपक खांबित :-**

शौचालयामध्ये २४ तास पाणी असते पाण्याची रेलचेल असते. त्यामध्ये गळती लिकेज होत असतात.

**जुबेर इनामदार :-**

प्रत्येक इमारतीमध्ये असते.

**दिपक खांबित :-**

बाकी ठिकाणी नसते टॉयलेटमध्ये असते. परंतू टॉयलेटचा वापर प्रत्येक ठिकाणी २४ तास होत असतो.

**जुबेर इनामदार :-**

म्हणजे २४ तास वापर होणाऱ्या वस्तूवर आपल्याला किती लक्ष दिले पाहिजे. उद्या माणसाचा अपघात झाला असता २४ तास जाण येणं आहे त्याच्यामध्ये.

**दिपक खांबित :-**

तुमच्या सर्व सुचना विचारात घेऊ.

**प्रकरण क्र. ३९ :-**

**मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर नं. ०३ उद्यानामधील विनावापर असलेले शौचालय तोडणेबाबत.**

**ठराव क्र. ३६ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व) शांतीनगर सेक्टर नं .3 उदयानामध्ये निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत मार्फत सन 2006 मध्ये सार्वजनिक शौचालय बांधण्यात आलेले आहे. सदरचे शौचालय हे तळ + 1 मजल्याचे आहे. सध्या सदरच्या शौचालयाचा वापर होत नाही तसेच शौचालयचा स्लॅब खराब झालेला असुन त्यामधुन गळती होत आहे , भिंती खराब झालेला आहेत त्यामुळे सदरचे शौचालय हे धोकादायक बनलेले आहे. तसेच सदरच्या शौचालयाचा वापर गर्दुले चरसी लोकांचा अड्डा बनलेला आहे. तसेच याबाबत बाजूच्या गृहनिर्माण सोसायटींनी सुध्दा तक्रारी केलेल्या आहेत. तरी सदरचे शौचालय तोडणेस, ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.**

सुचक :- श्री. मोहन म्हात्रे    अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंह

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४०, **महापौर वर्षा मॅरेथॉन-२०१९ करिता साहित्य खरेदीच्या दराबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात क्रीडा प्रयोगास चालना मिळणे करीता सन २०१९ या वर्षात मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दि.१८/०८/२०१९ रोजी महापौर वर्षा मॅरेथॉन चे आयोजन करण्यात येत आहे. सदर मॅरेथॉन मध्ये अर्ध मॅरेथॉन, ५ किमी मॅरेथॉन, १० किमी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येणार असुन सदर कार्यक्रमात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तसेच लगतच्या परिसरातील अंदाजे १०००० पेक्षा जास्त स्पर्धक भाग घेतील असा अंदाज आहे. सदर महापौर वर्षा मॅरेथॉन करीता साहित्य पुरवठा करणेकामी संदर्भ क्रं.२ अन्वये ''वृत्तमानस'' व ''परशुराम समाचार'' या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन **ऑनलाईन निविदा प्रक्रीयव्दारे निविदा** मागविण्यांत आल्या होत्या. त्याअन्वये बीड काऊंटपेजवरुन Cyruns Sports & wellness , Kesari Printers Limited व Adventures and You या तीन संस्थेच्या निविद प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदांच्या तांत्रिक निविदा उघडल्या असता ३ निविदाधारकांपैकी Cyruns Sports & wellness या संस्थेने महापौर वर्षा मॅरेथाम्न करीता साहित्य पुरवठा करणेकामीच्या निविदेकरीता आवश्यक सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. महापौर वर्षा मॅरेथॉनचे आयोजनाकरीता कमीत कमी कालावधी असल्याने मा. निविदा निवड समितीच्या मंजुरीअन्वये Cyruns Sports & wellness या संस्थेचे फायनान्शीयल बीड दि.१०/०७/२०१९ रोजी उघडले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| Sr. No. | Name of Work | Rate in Rs. (for 1 Nos.) | GST | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | Participate Kit (T-Shirt, Medal, Gugi Bags) | 510 | 91.80 | 601.80 |
| 2 | Timing Chip | 210 | 37.80 | 247.80 |
| 3 | Volunteers | 1200 | 216 | 1416 |
| 4 | Snacks | 85 | 15.30 | 100.30 |
| 5 | Radio Promotion | 1950 | 315 | 2265 |
| 6 | Online Social Media Marketing | 300000 | 5400 | 305400 |
| 7 | Offline Marketing (Hoardings, News paper) | - | - | - |
| 8 | Physical Registration Activation | 9500 | 1710 | 11210 |
| 9 | Prizes (Cash/ Kites) | 540000 | - | 540000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | Trophy and Reorganization of sponsor | 3540 | 637.20 | 4177 |
| 11 | Special Medals (Gold, Silver, Bronze) | 5500 | 990 | 6490 |
| 12 | Police Paid Expenses | - | - | - |
| 13 | Performer (Zuma Team, Entertainment, other) | 90000 | 16200 | 106200 |
| 14 | Buses for Runner and Transport | - | - | - |
| 15 | Photographer Event and on course | 250000 | 45000 | 295000 |
| 16 | Online Registration Charges | 60 | - | 60 |
| 17 | Website Publication Charges (Domain Registration & Marketing) | 147500 | 26550 | 174050 |
| 18 | Race Director Remuneration & Consultation | 150000 | 27000 | 177000 |
| 19 | Cyrus Team of Supervisor | 195000 | 35100 | 230100 |
| 20 | Race Director Travel & Stay | 150000 | 27000 | 177000 |
| 21 | Insurance Policy of Participate | 30 | 5.40 | 35.40 |
| 22 | Indicator Watch | 35000 | 6300 | 41300 |
| 23 | Misclanious & Sundry Expenses | 250000 | - | 250000 |

वरील तक्यात नमुद प्रमाणे Cyruns Sports & wellness या निविदाधारकांने ''महापौर वर्षा मॅरेथॉन २०१९ करीता साहित्य पुरवठा करणेकामी'' दर सादर केलेले आहेत. सदरचे दर दि.१६/०७/२०१९ रोजी मा. निविदा निवड समितीने मान्यता दिलेली असुन, सदरचे दर मा. स्थायी समिती समोर मंजुरीकरीता ठेवण्यास शिफारस आहे.

मा. महासभा ठराव क्रं.२३ दि.०७/०६/२०१९ अन्वये ''महापौर वर्षा मॅरेथॉन'' चे आयोजन करताना विविध कंपन्या व सामाजिक संस्थांकडुन प्रायोजक (Sponsorship) मिळविल्यास त्या बाबी वगळुन आवश्यकतेनुसार वरील दराने खरेदी करण्यास व तरतुद अपुरी पडल्यास मा. आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार योग्य त्या लेखाशिर्षामधुन तरतुद वर्ग करून खर्च करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आम्हाला चर्चा करायची आहे. तुम्ही तरतुदीपेक्षा जास्त तरतुदीची विषय इथे केला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

ठराव वाचन केले.

**जुबेर इनामदार :-**

सभापती महोदय ह्या विषयावर थोडे लक्ष दिले तर जे दर दिले आहेत आपण ह्याच्यावर थोडी वाटाघाटी समितीने मेहनत घेतली जशी नेहमी घेते. तर हा दर कमी होईल. पैसे वाचतील आम्ही पण कधीतरी मॅरेथॉन घेतले आहेत. आम्हालाही त्याचा अनुभव आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधी कुठेतरी कधीतरी विभागामध्ये अशा रेस ठेवल्या असतील. आज शहरामध्ये मा. महापौरांचे मोठमोठे होर्डिंग्ज वर्षा मॅरेथॉन संदर्भात लागले आहेत. स्थायी समितीला आज मंजूरीला आलेले आहे. स्थायी समितीने आर्थिक बाजूची मंजूरी दिली नाही. अजून कार्यादेश देण्यात आले नाहीत. तरी होर्डिंग्ज कसे लागले. मा. आयुक्त महोदय ही प्रशासकीय बाब आहे. महापौर आपल्या विश्वस्त आहेत प्रथम नागरिक आहेत. वर्षा मॅरेथॉन महापौर आपल्या स्वतःच्या पैशातून करणार नाहीत. पालिकेचाच पैसा लागणार आहे. होर्डिंग्ज लागले कसे?

**धृवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब मागची महासभा झाली. त्याच्यामध्ये महासभेने वर्षा मॅरेथॉन करण्यासाठी मान्यता दिली होती. त्याप्रमाणे पालिकेच्या प्रशासनाने प्लानिंग केली त्या प्लानिंग अन्वये........

**जुबेर इनामदार :-**

असू दे ज्याला काम देणार ज्याची निविदा मंजूर करणार ती नाव त्याच्यावर टाकली आहेत. त्याच्या निविदा अजून मंजूर कुठे झाल्या आहेत. स्थायी समितीने मंजूरी कुठे दिली. कायद्याचा भाग आहे की नाही?

**धृवकिशोर पाटील :-**

जो खर्च केला तो जाहिरात विभाग आहे त्या जाहिरात विभागाच्या तरतूदीतून होर्डिंग्ज लावल्या आहेत. त्याच्यामध्ये ह्याचा काही संबंध नाही.

**जुबेर इनामदार :-**

जाहिरात विभागाने लावल्या आहेत ना कुठली जाहिरात विभाग..........

**धृवकिशोर पाटील :-**

आपल्याकडे पालिकेची जाहिरात विभाग आहे. ते आपल्या महापालिकेचे होर्डिंग्ज लावतात त्या होर्डिंग्जमध्ये जे दर मंजूर आहे त्याप्रमाणे........

**जुबेर इनामदार :-**

खर्च कोणी केला.

**धृवकिशोर पाटील :-**

महापालिकेनी केला.

**जुबेर इनामदार :-**

बरोबर आहे त्याला मंजूरीच नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय आजचा जो विषय आलेला आहे तो महापौर मॅरेथॉन अरेंज करताना जो पार्टीसिपेटवर खर्च करायचा आहे. इव्हेन्ट अरेंज करायची आहे ह्याच्या संदर्भामध्ये आपल्या मंजूर ठेकेदाराच्या दराच्यामध्ये ज्या बाबीचा समावेश नाही अशाची निविदा काढलेली आहे. जे दर ऑलरेडी कुठल्या तरी ठेक्यामध्ये मंजूर नाहीत अशा दरासाठी आपण ही निविदा काढली आहे. इव्हेन्ट मॅनेजर नेमणे असेल पार्टीसिपेटसाठी टीशर्ट घेणे असेल त्याची खरेदी करणे असेल त्या बाबी ह्याच्यामध्ये समावेश आहे. ह्याच्यामध्ये आपल्याला टेन्ट उभे करायला लागणार स्टेजेस उभे करावे लागणार, जाहिरातीचे होर्डिंग्ज उभे करायला लागणार ह्याच्यामध्ये ज्या-ज्या विभागाकडे दर मजूर आहेत त्या-त्या मधून ही ॲक्टीव्हिटी सूरु केलेली आहे. दुसरा विषय सांगितला तरतुदीच्या बाहेर जाऊन खर्च होतो मुळात आपण ह्या पार्टीसिपेटला पार्टीसिपेशनसाठी फी लावली आहे. तसेच सर्वांच्या आपल्या माध्यमातून काही स्पॉन्सर मिळवण्याचा आपण प्रयत्न करतो. स्पॉन्सरच्या माध्यमातूनच खर्च करणार आहोत. पण इनकेस एखाद्या वेळी स्पॉन्सरच्या माध्यमातून ह्या ज्या दर मंजूरीसाठी बाबी दिल्या आहेत. हा सुध्दा खर्च आपण स्पॉन्सरच्या माध्यमातून करणार आहोत. परंतु एखाद्या ॲक्टीव्हिटीला स्पॉन्सर अव्हेलेबल झाला नाही तर ऐनवेळेला ती खरेदी किंवा ती इव्हेन्ट करण्यामध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून हे दर मंजूरीसाठी ठेवले आहेत. आपल्या अर्थसंकल्पीय मंजूर तरतुदीच्या अधीन म्हणजे सध्याला २५ लाख तरतूदच शिल्लक आहे. त्याच्याबाहेर जाण्याचा आपला मानस नाही. त्याच्यामध्ये जेवढ्या ॲक्टीव्हिटी होणार तेवढ्याच आपण करणार? बाकीच्या ॲक्टीव्हिटी आपण कितीही खर्च येवो मॅक्झीमम स्पॉन्सर मिळवण्याचा प्रयत्न करतो. एखाद्य ॲटमला म्हणजे एखादी चीप खरेदी करण्यासाठी स्पॉन्सर नाही मिळाला तर आपण दर मंजूर झाले त्याच्यातून चीप खरेदी करु आणि त्याच्यासाठी फी च्या माध्यमातून पैसे जमा होणार.

**जुबेर इनामदार :-**

६० रुपये ऑनलाईन रजिस्ट्रेशन चार्जेस जे स्पोर्टस इव्हेन्टस मॅनेजर आहेत किंवा ज्यांनी निविदा मंजूरीला दिलेले आहे. प्रशासनाने ह्या विषयावर बारकाईने लक्ष दिले असते तर ६० रुपये रजिस्ट्रेशन चार्जेस साहेब फ्री होते. आम्ही केले आहे. आम्ही इव्हेन्टस केले आहेत. २५००० लोकांचे इव्हेन्ट केले आहेत. ३०००० वर आमचे पार्टीसिपेन्ट होते. त्यांना आम्ही ऑनलाईन फ्री त्याला पैसेच लागत नाही. वाटाघाटी समितीचा हा विषय लक्षात आला नसेल म्हणून दुर्लक्ष झाले आहे. वाटाघाटी समितीकडे परत घेऊन जा. असे बरेच आहेत. रेस डायरेक्टर ट्रॅव्हल १ लाख ७७ हजार रुपये इथून मागवला तर फुकट येईल. त्याला प्रसिध्दी मिळेल वेबसाईट २५०० रूपये बनते.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ह्याच्यात जी.एस.टी पण ॲड केली आहे. पहिल्या कॉलममध्ये दर आहेत आणि त्याच्या दुसऱ्या कॉलममध्ये जी.एस.टी ॲड केली आहे.

**जुबेर इनामदार :-**

मी जी.एस.टी बघत नाही टोटलच बघते. जी.एस.टी. कधी होईल जेव्हा तुमचा मूळ मंजूर होईल. त्याच्यावर जी.एस.टी. लागेल तो शासनाचा कर आहे तो तुम्हाला भरावाच लागेल.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब विषय असा आहे..........

**जुबेर इनामदार :-**

साहेब प्रशासनाला बोलू द्या. ते कधी उत्तर देतील तुम्ही त्याच्या जागेवर जाऊन बसा. आम्ही प्रशासनाकडून उत्तर मागितले आहे. अतिरिक्त आयुक्त तुमचे प्रशासकीय कामकाजावर अनुभव आहे ना.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय आपण म्हणता की स्पर्धा अरेंज करण्याचा अनुभव आहे. आपल्याकडे अशाप्रकारे काम करणारी मंडळी आहे. ह्या मंडळीनी निविदा प्रक्रियामध्ये भाग घ्यायला पाहिजे होता.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आमची बैठक लावली शुक्रवारी अशा दिवशी बैठक लावली ज्या दिवशी आमची उपस्थिती नसेल. बैठक १२ आमचे नमाज १ वाजता असते. आमची आठवड्यातून एक दिवस प्रार्थना असते. ती आम्हाला महत्वाची असते. आम्ही सगळ काय सोडून ते करु. आम्हाला करावेच लागेल. आम्हालाही समाजामध्ये जगायचे आहे आम्ही त्या बैठकीला आले असते तर १०० टक्के चर्चा झाली असती.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांचा हा मुद्दा बरोबर आहे. एका दिवशी बैठक आयोजित केली आणि ते येऊ शकले नसते परंतु हा सदस्यांनी निविदा प्रक्रियामध्ये भाग घेण्याचा विषय नाही. इव्हेन्ट मॅनेजमेन्ट करणारी मंडळी आहेत. त्यांनी निविदा प्रक्रियामध्ये भाग घेण्याचा विषय आहे. त्यांनी ह्या स्पर्धेमध्ये निश्चितपणे भाग घ्यायला पाहिजे होता.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाच्या वाटाघाटी समिती सुध्दा जी वस्तू मला समजून येत आहे साहेब तुम्ही माझ्यापेक्षा जास्त अनुभवी आहेत. प्रशासकीय कामकाजामध्ये मी प्रशासनाचा भाग नाही. माझ्या टीकाटिप्पणी चुकीच्या असू शकतात.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

टिका टिप्पणी हा आपल्या चर्चेचा अविभाज्य भाग आहे. त्याच्यामध्ये आम्ही वेगळे कन्सीडर करत नाही. आपल्या सुचनांकडे सकारात्मक दृष्टीनेच बघत असतो. परंतु मूळ मुद्दा असा आहे की आपली स्पर्धा १८ ऑगस्ट रोजी आयोजित केली आहे. ही निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर ज्या ज्या ठिकाणी अशा इव्हेन्ट अरेंज करणा-या मंडळी आहेत त्यांचे अशा गोष्टीकडे लक्ष असते. ज्यांना इंटरेस्ट आहे त्यांनी भाग घ्यायला हवा होता. आता आपल्याही शहरामध्ये ही स्पर्धा पहिल्यांदा आयोजित होते. पुढल्या वर्षी कदाचित ह्या अनूभवातून पालिकेकडून खर्च करण्याची गरज पडणार नाही. आपण जास्त जोमाने पुढे जाऊ आणि स्पॉन्सरच्या माध्यमातून करु. परंतु हे पहिले वर्ष होतं.

**जुबेर इनामदार :-**

मॅरेथॉन ह्याच्या आधी केले आहे. हे पहिल वर्ष नाही. वर्षा मॅरेथॉन पहिल्यांदा करतो. मॅरेथॉन दरवर्षी होते.

**मा. सभापती :-**

कॉर्पोरेशनच्या मार्फत कुठे झाले.

**जुबेर इनामदार :-**

कॉर्पोरेशनच्या माध्यमातूनच होते. वर्षा मॅरेथॉन पहिल्यांदा होते.

**मा. सभापती :-**

महापौर चषक झाले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मॅरेथॉन म्हणजे धावायचा विषय आहे. ४२ किलो मीटर फुल मॅरेथॉन ती मुंबईमध्ये केली जाते. तुम्ही अर्ध मॅरेथॉन २१ किलो मीटरची ठेवली तेवढाच फरक आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब मिरा भाईंदर महापालिकेतर्फे हा पहिलाच आणि चांगला उपक्रम आहे. ह्याच्यामध्ये २१.०९ ही हाफ मॅरेथॉन आपण ठेवलेली आहे. ऑनलाईन ॲडव्हटाईजमेंट पेपरला दिली होती. प्रसिध्दी करण्यात आली होती. तशा आशयाच्या दोन बैठका एक गटनेत्याची लावली होती आणि प्रत्येक पक्षाच्या नगरसेवकाची आपण बोलवली होती. त्याचा विचार विनिमय केलेला आहे. ज्यांना इंटरेस्ट असेल त्या इव्हेन्ट कंपनीनी निविदा भरायला पाहिजे होती तसेच ह्याच्यामध्ये जो इव्हेन्ट मॅनेजर आहे त्याचे काही खर्च इन्क्लूड आहे आणि प्रशासनाने ह्याच्यामध्ये पारदर्शकता केलेली आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मी निवेदन करु इच्छितो की हे जे दर मागवले आहे त्या दराच्या माध्यमातून खरेदी करुच किंवा अशा पध्दतीने पालिका फंडातून पैसे देऊ अशातला भाग नाही. आपण एक्स्ट्रीम स्टेजला सेफ्टी असावी अशा

पध्दतीचे दर मंजूर करुन ठेवतो. ज्यावेळेस स्पॉन्सर मिळणार नाहीत ही जी मंडळी आहे ह्याच्यासाठी स्पॉन्सर मिळाले तर हे पण पैसे दिले जातील. आपण आपल्या फंडातून हा निधी आपण शक्यतो देणार नाही. बहुतेक बाबीमध्ये हा खर्च करणार नाही. काही बाबतीमध्ये स्पॉन्सर कमी पडले तर आपल्याला हा खर्च करण्याचा विषय येतो. अदरव्हाईज येणार सुध्दा नाही आणि ९९ टक्के ह्याच्यातून खर्च करण्याची गरज पडणार नाही असे सर्वजण मिळून प्रयत्न करु.

**जुबेर इनामदार :-**

परमेश्वराची कृपा असेल तर आपल्याला भरपूर स्पॉन्सर मिळतील. एकदा दराची प्रसिध्दी झाली अपेक्षा जितकी होऊन जाते ऑनलाईन सोशल मिडीया मार्केटींग म्हणजे सोशल मिडीया, फेसबुक इन्स्टाग्राम किंवा व्हॉट्सअप त्याला इथे तीन लाख खर्च सुचवला आहे. आज तुम्ही स्पॉन्सरकडून तीच अपेक्षा ठेवणार म्हणजे एका बाजूला तो तसाच खर्च वाढलेला आहे. म्हणजे स्पॉन्सर तुम्हाला तीन लाख नंतर देईल का? त्याला द्यायचे आहे लाख रुपये ५०००० त्याचा बजेट आहे. प्रत्येक कपनीचा एक बजेट असतो. त्याचा इव्हेन्टचा एक बजेट असतोच असतो. आपण त्याचा कॉस्टच इतका वरती केला.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये एखाद्याची कॅपेसिटी नसेल तर दोघेजण एक ॲक्टीव्हिटी स्पॉन्सर करतील असा विषय आहे.

**राजीव मेहरा :-**

सर लेकिन हर एम.एम.सी. का रेग्यूलर ॲक्टीव्हिटी चालू रहता है उनको पता है की सोशल मिडीया में कितना खर्चा होता है।

**धृवकिशोर पाटील :-**

सर हा रेट मंजूर केला. आपण ह्याला पेमेन्ट दिले नाही.

**राजीव मेहरा :-**

जो कंपनी ३०००० में कराती है वो आपको तीन लाख क्यों देगी। यह तीन लाख रुपये जैसे साहबने बोला ऑनलाईन सोशल मिडीया एक्स ऑर बिडन्ट है वह।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मैं फिर से यह कहना चाहूँगा की अगर कोई ॲक्टीव्हीटी हमे करके दे तो भी हमे कोई दिक्कत नही। स्पॉन्सर पैसे दे ऐसी बात नही अगर ॲक्टीव्हीटी करके दे तो भी दिक्कत नही।

**निला सोंस :-**

मा. आयुक्त मैं सिर्फ जानना चाहती हूँ की जैसे इव्हेन्ट को सपोर्ट करने के लिए स्पॉन्सरशिप का हमने क्लॉज डाला है वॉट इज अकाऊंटीबीलीटी कीस हेड में पेमेन्ट लिया जाएगा। उसके अंदर ट्रान्सफरन्सी कैसे क्रिएट की जाएगी। वॉट इज द सिस्टम स्पॉन्सर शिप कैसे लेंगे।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

महापालिका नही देगी।

**निला सोंस :-**

वेंडर को पेमेन्ट करना महापालिका वील नॉट बी टेकींग द पेमेंट.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नो.

**निला सोंस :-**

देन वाय वी आर पूटींग धिस इन धिस पेपर. गोषवारा वेन दे आर नॉट अकाऊंटेबल देन वाय इट अज ऑन पेपर.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

अगर स्पॉन्सर नही मिलता है तो क्या करेंगे। इव्हेन्ट तो करना है तो कोई ऐसी ॲक्टीव्हिटी है जिसको स्पॉन्सर नही मिलता है तो हमारे रेट मंजूर हो जिसके माध्यम से हम काम कर सके।

**निला सोंस :-**

हम स्पॉन्सरशिप के लिए कोई अकाऊन्ट नही ले रहे हम डायरेक्ट दे नही सकते। महापालिका डायरेक्ट दे नही सकते। महापालिका डायरेक्ट ले नही सकती फिर उसपे पेपर पे होना भी सार्थक नही है।

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

जो ॲक्टीव्हिटी बाहर से मिलने के चान्सेस अगर तयार होते है तो हमारा कोई तो रेट मंजूर हो तो हम मार्केट से ले सके।

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ४० :-**

**महापौर वर्षा मॅरेथॉन-२०१९ करिता साहित्य खरेदीच्या दराबाबत.**

**ठराव क्र. ३७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात क्रीडा प्रयोगास चालना मिळणे करीता सन २०१९ या वर्षात मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दि.१८/०८/२०१९ रोजी महापौर वर्षा मॅरेथॉन चे आयोजन करण्यात येत आहे. सदर मॅरेथॉन मध्ये अर्ध मॅरेथॉन, ५ किमी मॅरेथॉन, १० किमी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येणार असुन सदर कार्यक्रमात मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील तसेच लगतच्या परिसरातील अंदाजे १०००० पेक्षा जास्त स्पर्धक भाग घेतील असा अंदाज आहे. सदर महापौर वर्षा मॅरेथॉन करीता साहित्य पुरवठा करणेकामी संदर्भ क्रं.२ अन्वये "वृत्तमानस" व "परशुराम समाचार" या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन **ऑनलाईन निविदा प्रक्रीयव्दारे निविदा** मागविण्यांत आल्या होत्या. त्याअन्वये बीड काऊंटपेजवरुन Cyruns Sports & wellness , Kesari Printers Limited व Adventures and You या तीन संस्थेच्या निविद प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदांच्या तांत्रिक निविदा उघडल्या असता ३ निविदाधारकांपैकी Cyruns Sports & wellness या संस्थेने महापौर वर्षा मॅरेथाम्न करीता साहित्य पुरवठा करणेकामीच्या निविदेकरीता आवश्यक सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. महापौर वर्षा मॅरेथॉनचे आयोजनाकरीता कमीत कमी कालावधी असल्याने मा. निविदा निवड समितीच्या मंजुरीअन्वये Cyruns Sports & wellness या संस्थेचे फायनान्शीयल बीड दि.१०/०७/२०१९ रोजी उघडले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| Sr. No. | Name of Work | Rate in Rs. (for 1 Nos.) | GST | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | Participate Kit (T-Shirt, Medal, Gugi Bags) | 510 | 91.80 | 601.80 |
| 2 | Timing Chip | 210 | 37.80 | 247.80 |
| 3 | Volunteers | 1200 | 216 | 1416 |
| 4 | Snacks | 85 | 15.30 | 100.30 |
| 5 | Radio Promotion | 1950 | 315 | 2265 |
| 6 | Online Social Media Marketing | 300000 | 5400 | 305400 |
| 7 | Offline Marketing (Hoardings, News paper) | - | - | - |
| 8 | Physical Registration Activation | 9500 | 1710 | 11210 |
| 9 | Prizes (Cash/ Kites) | 540000 | - | 540000 |
| 10 | Trophy and Reorganization of sponsor | 3540 | 637.20 | 4177 |
| 11 | Special Medals (Gold, Silver, Bronze) | 5500 | 990 | 6490 |
| 12 | Police Paid Expenses | - | - | - |
| 13 | Performer (Zuma Team, Entertainment, other) | 90000 | 16200 | 106200 |
| 14 | Buses for Runner and Transport | - | - | - |
| 15 | Photographer Event and on course | 250000 | 45000 | 295000 |
| 16 | Online Registration Charges | 60 | - | 60 |
| 17 | Website Publication Charges (Domain Registration & Marketing) | 147500 | 26550 | 174050 |
| 18 | Race Director Remuneration & Consultation | 150000 | 27000 | 177000 |
| 19 | Cyrus Team of Supervisor | 195000 | 35100 | 230100 |
| 20 | Race Director Travel & Stay | 150000 | 27000 | 177000 |
| 21 | Insurance Policy of Participate | 30 | 5.40 | 35.40 |
| 22 | Indicator Watch | 35000 | 6300 | 41300 |
| 23 | Misclanious & Sundry Expenses | 250000 | - | 250000 |

वरील तक्यात नमुद प्रमाणे Cyruns Sports & wellness या निविदाधारकांने ''महापौर वर्षा मॅरेथॉन २०१९ करीता साहित्य पुरवठा करणेकामी'' दर सादर केलेले आहेत. सदरचे दर दि.१६/०७/२०१९ रोजी मा. निविदा निवड समितीने मान्यता दिलेली असुन, सदरचे दर मा. स्थायी समिती समोर मंजुरीकरीता ठेवण्यास शिफारस आहे.

मा. महासभा ठराव क्रं.२३ दि.०७/०६/२०१९ अन्वये ''महापौर वर्षा मॅरेथॉन'' चे आयोजन करताना विविध कंपन्या व सामाजिक संस्थांकडुन प्रायोजक (Sponsorship) मिळविल्यास त्या बाबी वगळुन आवश्यकतेनुसार वरील दराने खरेदी करण्यास व तरतुद अपुरी पडल्यास मा. आयुक्त यांनी आवश्यकतेनुसार योग्य त्या लेखाशिर्षामधुन तरतुद वर्ग करून खर्च करण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१, **स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपीकांच्या नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्थानिक संस्था कर विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर सध्या ०५ ऑडीट लिपीक या पदावर किमान वेतन रु. १५,३९३/- या ठोक मानधनावर कार्यरत आहेत. ०५ ऑडीट लिपीक यांची मुदत दि.१९/०२/२०१९ रोजी संपुष्टात आली आहे. सदर कर्मचा-यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांची नावे | पदनाम | मुदत संपण्याची दिनांक | नवीकरण कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. सचिन सुपूगडे | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |
| २. | श्री. सुशांत सुर्वे | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |
| ३. | श्रीम. हेमाली बावकर | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |
| ४. | श्री. रविनाथ शिवगण | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |
| ५. | श्रीम. निशा पटेल | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |

सदर बाबत आरोग्य विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, स्थानिक संस्था कर विभाग, कर विभाग यांची ०५ ऑडीट लिपीक कर्मचा-यांची यापुढेही आवश्यकता असल्याने मुदतवाढीसाठी शिफारस आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार नेमणुकीच्या नवीकरणासाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवून मंजुरी घेणे आवश्यक असल्याने सदर ०५ ऑडीट लिपीक यांची मुदत दि.१९/०२/२०१९ रोजी संपूष्टात येत असल्याने दि.२०/०२/२०१९ रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड दि.२१/०२/२०१९ ते दि. २४/०७/२०१९ पर्यंत कार्योत्तर मंजूरी व पुढे दि.२०/०८/२०१९ पर्यंत नव्याने नवीकरण करणेस मंजूरी देत आहे. तसेच महापालिकेने सर्व विभागात लागणारे आवश्यक कर्मचा-यांची ठेका पध्दतीने एकत्रित निविदा काढण्याचा प्रस्तावास मंजूरी दिली असुन त्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामध्ये प्रशासनाने गरज वाटल्यास या पदांचा समावेश करावा व सदर पदांकरीता नव्याने अर्ज मागवण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**राकेश शाह :-**

माझे अनुमोदन आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

प्रशासनमध्ये जेवढे आवश्यक ठेका पध्दतीने कर्मचारी लागणार आहेत त्या सर्वांची एकत्रित निविदा काढायची जेणेकरुन हा प्रत्येक स्टॅन्डिंगमध्ये विषय येतो ना ह्याला मंजूरी त्याला मंजूरी द्या. मे १९ ला ह्याची मंजूरी संपली होती. आज जुलै चालू आहे. एवढा डिले झाला आहे हा डिले होऊ नये म्हणून एकत्रित एकच निविदा काढायची. महापालिकेच्या सर्व विभागामध्ये किती पदाची आवश्यकता आहे. त्या पदाला अनुसरुन निविदा काढायची आणि त्यांची एकच दिवशी मुदतवाढ असे आपण केले आहे.

**जुबेर इनामदार :-**

मुदत २०.०२ ला संपली आणि लोकसभेच्या निवडणूका लागल्या. ४५ दिवस आहेत आम्हाला कशाला दोषी करता. आम्ही काय पाप केले पुढच्या २० तारखेला मुदत संपणार ७ वा महिना चालू आहे. किती दिवस शिल्लक आहेत फक्त १७ दिवस.

**मा. सभापती :-**

प्रशासन समितीपूढे प्रस्ताव वेळेवर का देत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय प्रशासनाकडून कर्मचारी ठेका पध्दतीने घेण्याच्या निविदा ह्या पूर्वी झालेल्या आहेत. त्याच्या मुदती संपलेल्या आहेत. आम्ही वारंवार प्रयत्न करतो की हा प्रस्ताव वेळेमध्ये यावा. ह्याच्यामध्ये काही विभागाची एकत्र करण्याची ॲक्टीव्हिटी सुरु आहे. ती कदाचित ह्या २० तारखेपर्यंत सपुष्टात आली तर मुदतवाढीची ह्याला आवश्यकता पडणार नाही. हे सगळे त्याच्यामध्ये समावेश होईल. आपल्याकडे वेगवेगळ्या विभागाचे जे स्टॅन्डिंगला विषय येतात ते येणार नाही अशा पध्दतीने..........

**जुबेर इनामदार :-**

मान्य आह. चांगली गोष्ट आहे. तुम्ही चांगला विषय काढलात. कोणत्याही विभागाची मुदत वाढ संपणार असेल तर ते सर्व एकत्र घेऊन या. आणि जर नाही घेऊन आले तर त्या विभागीय अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार ते सांगा.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ह्याचा आम्ही निश्चितपणे आढावा घेतो. सर्व एकत्रित............

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे. जर नाही झाले तर काय कारवाई करणार?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

तशी काही घटना घडली तर बघू.

**जुबेर इनामदार :-**

बघू म्हणजे काय.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

कोण दोषी आहे त्याच्यावरती नियमाप्रमाणे.

**जुबेर इनामदार :-**

५६ प्रमाणे कारवाई करा हलगर्जीपणा कामामध्ये कामचुकारपणा.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ह्या सर्व गोष्टी प्रशासकीय कामकाजाचा अविभाज्य भाग आहे दोषी विरुध्द कारवाई होतच असते.

**जुबेर इनामदार :-**

आजपर्यंत झाली नाही. कारवाई कोणती करतो भ्रष्टाचाराला जे लोक आड आले आहेत त्यांच्यावर कारवाई झाली. कामचूकारपणामुळे कोणावर कारवाई केली ते मला सांगा हा पालिकेचा इतिहास आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

निश्चितपणे काळजी घेऊ.

**मा. सभापती :-**

निविदाची जाहिरात कधी येणार.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुमच्या ऑडिट रिपोर्टला मंजूरी देतो. ताशोरे ओढलेल्या ऑडिट रिपोर्टला आमच्याकडून मंजूरी घेता.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ४१ :-**

**स्थानिक संस्था कर विभागातील तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या ऑडीट लिपीकांच्या नियुक्तीचे नवीकरण करणेबाबत.**

**ठराव क्र. ३८ :-**

स्थानिक संस्था कर विभागात तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधनावर सध्या ०५ ऑडीट लिपीक या पदावर किमान वेतन रु. १५,३९३/- या ठोक मानधनावर कार्यरत आहेत. ०५ ऑडीट लिपीक यांची मुदत दि.१९/०२/२०१९ रोजी संपुष्टात आली आहे. सदर कर्मचा-यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांची नावे | पदनाम | मुदत संपण्याची दिनांक | नवीकरण कालावधी |
|---|---|---|---|---|
| ६. | श्री. सचिन सुपूगडे | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |
| ७. | श्री. सुशांत सुर्वे | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |
| ८. | श्रीम. हेमाली बावकर | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |
| ९. | श्री. रविनाथ शिवगण | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |
| १०. | श्रीम. निशा पटेल | ऑडीट लिपीक | दि. १९/०२/२०१९ | दि.२१/०२/२०१९ ते दि.२०/०८/२०१९ |

सदर बाबत आरोग्य विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, स्थानिक संस्था कर विभाग, कर विभाग यांची ०५ ऑडीट लिपीक कर्मचा-यांची यापुढेही आवश्यकता असल्याने मुदतवाढीसाठी शिफारस आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार नेमणुकीच्या नवीकरणासाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवून मंजुरी घेणे आवश्यक असल्याने सदर ०५ ऑडीट लिपीक यांची मुदत दि.१९/०२/२०१९ रोजी संपूष्टात येत असल्याने दि.२०/०२/२०१९ रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड दि.२१/०२/२०१९ ते दि. २४/०७/२०१९ पर्यंत कार्योत्तर मंजूरी व पुढे दि.२०/०८/२०१९ पर्यंत नव्याने नवीकरण करणेस मंजूरी देत आहे. तसेच महापालिकेने सर्व विभागात लागणारे आवश्यक कर्मचा-यांची ठेका पध्दतीने एकत्रित निविदा काढण्याचा प्रस्तावास मंजूरी दिली असुन त्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामध्ये प्रशासनाने गरज वाटल्यास या पदांचा समावेश करावा व सदर पदांकरीता नव्याने अर्ज मागवण्यास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४२, **महानगरपालिकेच्या विविध विभागातील बाहयमार्गाने (Out Sourcing ) ठेका पध्दतीने संगणक चालक तथा लिपीक यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**राकेश शाह :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका व मे . गणेश कृपा ट्रान्सपोर्ट कंपनी यांच्या समवेत झालेल्या दि.**30/11/2015** रोजीच्या करारनाम्यानुसार **कंत्राटी** संगणक चालक पुरवठा करण्याची मुदत दि .**29/11/2018** रोजी संपुष्टात आली आहे**.**

संगणक चालक नव्याने निवीदा मागविणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव गोषवारा सादर केला होता. त्याअनुषंगाने मा. महासभा दि.**19/01/2019** ठराव क्र.**108** अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच **2** महिन्याकरीता कामास मुदतवाढ देण्यात आली होती . त्या अनुषंगाने मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांनी **89 कंत्राटी** संगणक चालक यांचा पुरवठा केला. मात्र सदरची मुदत संपुष्टात आली आहे.

महानगरपालिका विविध विभाग प्रमुख यांनी संगणक चालक उपलब्ध करुन देणेबाबत व सदर विभागात कार्यरत असलेले **कंत्राटी** संगणक चालक यांना मुदतवाढ देण्यात यावी असे कळविले आहे . प्रशासनामार्फत नविन निविदा काढण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे . सदर निविदा पूर्ण होईपर्यंत **कंत्राटी**संगणक चालक यांना मंजूर निविदाधारकांना सदर निविदा पूर्ण होईपर्यंत **कंत्राटी** संगणक चालक यांचा पुरवठा करणेबाबत मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांना निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम **53 (3)** अन्वये **6** महिन्यांपर्यंत नियुक्तीचे नविकरण करण्याचे मा. आयुक्त सो यांना अधिकार आहेत. दि.**26/06/2019** रोजीच्या मा. आयुक्त सो. यांच्या निर्देशानुसार नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधी करीता **कंत्राटी** संगणक चालक पुरवठा करण्याकरीता मुदतवाढ तसेच प्रशासकिय व आर्थिक मंजूरी ही सभा देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय २६.०६ ला मुदत संपली. त्याच्या नंतर हा विषय समितीला अधिकार दिले अशाप्रकारे मुदतवाढ द्यायची शासनाचा जी.आर आहे. शासनाने ह्या विषयावर नविन निर्णय घेतला आहे की तुम्हाला अशी मुदतवाढ देता येत नाही. सचिव साहेब ह्याच्याअगोदर महासभेत चर्चा झाली की अशाप्रकारे शासनाचे आलेली अधिसुचना आम्हाला वेळोवेळी देत जा. ६ महिन्यानंतर मुदतवाढ देता येत नाही अशी अधिसुचना आली आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सभापती महोदय हे २०१५ चे टेंडर आहे. आपण वेळोवेळी मुदतवाढ देऊन सर्वच विभागामध्ये आवश्यक असलेल्या सर्व मॅनपावरचा एकत्रित ठेका काढेपर्यंत हा मुदतवाढीचा विषय आहे.

**जुबेर इनामदार :-**

मी मुदतवाढीला विरोध करत नाही. शासनाचा निर्णय समोर आणा. शासनाने नविन निर्णय दिला आहे तुम्हाला मुदतवाढ देता येत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

असा जी.आर आपल्याकडे असेल तर सांगा.

**जुबेर इनामदार :-**

जी.आर मागवून घ्या. मी विरोध करत नाही. मला गोरगरिबांवर अन्याय करायचा नाही. शासनाचा निर्णय आहे ६ महिन्यानंतर तुम्हाला देता येत नाही. देता आले तर हरकत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

१९ जानेवारी १९ च्या महासभेमध्ये महासभेने ठराव केला. ठरावात असे म्हटले आहे की ठेका पध्दतीने पुरवठा करणे आवश्यक असल्याने सदर कंत्राटी संगणक चालक ह्यांना दि. ३१.०१.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. महासभा ठराव करते की ३१.०१ पर्यंत ह्यांना मुदतवाढ देण्यात यावी आणि ठेका पध्दतीने संगणक चालक तथा लिपीक पुरवठा करण्याबाबत जाहिर सुचना प्रसिध्द करावी. प्रशासन महासभेचे पण ऐकत नाही. प्रशासन महासभेपेक्षा मोठे झाले आहे का? महासभेत ठराव झाल्यावर त्याची अंमलबजावणी करायला पाहिजे. आणि जर अंमलबजावणी करत नसतील तर फेरविचारासाठी आणले पाहिजे किंवा ठराव विखंडीत करायला पाहिजे होता. तसे न करता सरळ सरळ त्या संगणक चालकांना प्रशासनाने कामावर ठेवले ते कोणत्या अधिकारात ठेवले. प्रशासनाने नविन निविदा काढायला पाहिजे होती.

**वर्षा भानुशाली :-**

आपने अभी बोला मुदतवाढ दे रहे है त्याचे मिनिंग काय? जर तुम्हाला गरज आहे तर तुम्ही जे टेंडर काढता ते लांब काढा ते टेंडर १० वर्षाचे काढा.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नविन प्रक्रिया आपण त्या प्रमाणेच राबवतो. सर्वांची एकत्रित नविन प्रक्रिया करुन. परत नव्याने असा विषय होणार नाही.

**वर्षा भानुशाली :-**

तुम्ही टेंडर काढताना जे लोक संगणकचे काम करतात त्यांना ६-६ महिने पगार पण देत नाही. ते काय समजत नाही. आपण २०१५ पासून मुदतवाढच घेता. जे काम करणाऱ्या लोकांना पगार सुध्दा भेटत नाही. तर ते आमचे काय काम करुन देणार. त्याच्यावर कायदा अनुसार काम करा. तुम्ही महासभेचे पण ऐकत नाही. जी.आर प्रमाणे पण करत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आपण ह्यापुढे विभागाची जी मॅन पॉवरची रिक्वायरमेंट आहे त्याचा एकत्रित ठेका काढतो.

**जुबेर इनामदार :-**

ह्या विषयामध्ये जर अधिसुचना नसली तर त्या अधिसुचनेला अधिन राहून कारवाई करण्यात यावी. सचिवांना विभागीय पत्र पाठवा की सचिवांकडे आलेला शासकीय पत्रव्यवहार केले पाहिजे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४२ :-**

**महानगरपालिकेच्या विविध विभागातील बाह्यमार्गाने (Out Sourcing ) ठेका पध्दतीने संगणक चालक तथा लिपीक यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका व मे . गणेश कृपा ट्रान्सपोर्ट कंपनी यांच्या समवेत झालेल्या दि.**30/11/2015** रोजीच्या करारनाम्यानुसार **कंत्राटी** संगणक चालक पुरवठा करण्याची मुदत दि .**29/11/2018** रोजी संपुष्टात आली आहे.

संगणक चालक नव्याने निवीदा मागविणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव गोषवारा सादर केला होता. त्याअनुषंगाने मा. महासभा दि.**19/01/2019** ठराव क्र.**108** अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता तसेच **2** महिन्याकरीता कामास मुदतवाढ देण्यात आली होती . त्या अनुषंगाने मे. गणेशकृपा ट्रान्सपोर्ट यांनी **89** **कंत्राटी** संगणक चालक यांचा पुरवठा केला. मात्र सदरची मुदत संपुष्टात आली आहे.

महानगरपालिका विविध विभाग प्रमुख यांनी संगणक चालक उपलब्ध करुन देणेबाबत व सदर विभागात कार्यरत असलेले **कंत्राटी** संगणक चालक यांना मुदतवाढ देण्यात यावी असे कळविले आहे . प्रशासनामार्फत नविन निविदा काढण्याची प्रक्रिया प्रस्तावित आहे . सदर निविदा पूर्ण होईपर्यंत **कंत्राटी**संगणक चालक यांना मंजूर निविदाधारकांना सदर निविदा पूर्ण होईपर्यंत **कंत्राटी** संगणक चालक यांचा पुरवठा करणेबाबत मे. गणेश कृपा ट्रान्सपोर्ट यांना निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम **53 (3)** अन्वये **6** महिन्यांपर्यंत नियुक्तीचे नविकरण करण्याचे मा. आयुक्त सो यांना अधिकार आहेत. दि.**26/06/2019** रोजीच्या मा. आयुक्त सो. यांच्या निर्देशानुसार नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंतच्या कालावधी करीता **कंत्राटी** संगणक चालक पुरवठा करण्याकरीता मुदतवाढ तसेच प्रशासकिय व आर्थिक मंजूरी ही सभा देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह** **अनुमोदन :- श्री. श्रीप्रकाश सिंग**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, **महानगरपालिकेतील विविध विभागातील अस्थायी स्वरुपात ठोक मानधनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या , कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ मधील व सलग्न कायद्यामधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीकरिता सल्लागार नेमणेबाबत . (मा. स्थायी समिती सभा दि . ०३/०७/२०१९ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. २८)**

**धृवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब ह्या विषयामध्ये २४.०५.१९ पासून ही पद व्यपगत करण्यात आली आहे असा शासनाचा निर्णय आहे आणि शासनानी पत्र तुम्हाला दिले आहे. हा धोरणात्मक निर्णय घ्यायचा हा स्टॅन्डिंगमध्ये यायला नाही पाहिजे. कारण ४७ पदाचा शासनानी आपल्याला निर्णय दिलेला आहे. २६.०७.२०१९ रोजी भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुगालयाची १०९ पदे दि. २४.५.१९ पासून व्यपगत करण्यात आलेली आहेत. त्यामुळे वरील अधिकारी, कर्मचारी ह्यांची पदे शासन पुढील आदेश होईपर्यंत व्यपगत न करण्याकरिता नगरविकास विभागास प्रस्ताव सादर करण्यास विनंती आहे. हा विषय धोरणात्मक असल्यामुळे महासभेपूढे जाणे आवश्यक आहे असे मला वाटते. तरी तुम्ही ह्याचा नीट विचार विनिमय करा. आपले विधी अधिकाऱ्यांकडून सल्ला घ्या. आपण व्यपगत नाही केला आणि पुन्हा आले पून्हा कारवाई करणे शासनाकडून मंजूरी घेणे ह्यासाठी वेळ झाला तर डिले होण्याची शक्यता आहे. ह्याचा भुर्दंड महापालिकेवर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून ह्याचा अभ्यास करा.

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहेबांनी ह्याची माहिती द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

अनु क्र. १,२,६ अधिकाऱ्यांचे महापालिकेमध्ये पद नसल्यामुळे शासनाकडून आपण मार्गदर्शन मागवले आहे. पद जरी नाही तरी आपण त्यांना भरती करुन घेतले आहे आणि त्यांना पगार पण देतो ते शासनाकडे पण जाणार नाही. आपल्याकडे पण राहू शकणार नाही.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

पद असलेलेच सर्व भरलेले आहेत. ज्या वेळेस टेंभ्याची १९७ पदे अस्तित्वात होती. त्यावेळेस पदभरती केलेली आहे त्यापैकी महापालिकेकडे राहण्याचा विकल्प केलेले कर्मचारी ज्यांचे समावेशन आपल्याकडे होऊ शकते अशाचे समावेशन वैद्यकिय अधिकाऱ्यांनी पॅरा मेडिकल स्टाफचे केलेले आहे. शासनाकडे जे ३५ कर्मचारी जाणार होते त्यांचे शासनाकडे समावेशन होणार आहे परंतु तो विषय शासनाकडे प्रलंबित आहे त्यांचे अजून समावेशन झाले नाही. ३ कर्मचारी शासनाकडे गेले नव्हते आणि महापालिकेकडे विकल्प दिला त्यांच्यासाठी महापालिकेकडे ती स्पेशालिस्टची विशिष्ठ पद आहेत. ती आपल्याकडे नाही म्हणून त्याबाबत आपण मार्गदर्शन मागवले आहे की ह्या पदाबाबत काय निर्णय घ्यायचा पद अस्तित्वात असतानाच नियमाप्रमाणे भरती केली होती.

**वंदना पाटील :-**

ह्याच्यात काय काय सेवा चालू आहेत.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

रुग्णालयामध्ये मॅर्टनिटी सेवा २४ तास चालू आहे. त्याच्यात नॉर्मल डिलीव्हरी आणि सिजेरीयन करतो. एक्सरे फॅसिलीटी आहे. ठराविक काळामध्ये सोनोग्राफी आहे. पॅथोलॉजिकल लॅबोरेटरी चालू आहे. मेडिकल सर्जिकलचे रुग्ण ॲडमीट करतो. एन.आर.सी. चालू आहे. कुपोषित मुलांना भरती करुन उपचार देतो.

**वंदना पाटील :-**

रुग्णाची तपासणी करण्यासाठी किती डॉक्टर आहेत. म्हणजे ताप, सर्दी, खोकल्यासाठी.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

त्याच्यासाठी ७ स्पेशलिस्ट आहेत इतर वैद्यकिय अधिकारी बी.एम.एस शासनाचे आणि आपले मिळून एकूण ८ आहेत.

**वंदना पाटील :-**

एक डॉक्टर किती रुग्ण तपासतो.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

ओ.पी.डी. ह्याच्यानुसार आहे आरोग्य केंद्रात १५० जरी पेशंट आले तरी...........

**वंदना पाटील :-**

आता भिमसेन जोशी....................

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

तिथे पण तसेच आहे. म्हणजे ओ.पी.डी. मध्ये गायनोकोलॉजीस्ट बसलेला आहे. ऑर्थोपेडेशियन, फिजीशियन आहे त्या दिवशी येणारे पेशंट म्हणजे १५० आले तरी बघायला लागतील आणि ६० आले तरी बघायला लागतील.

**वंदना पाटील :-**

ओ.पी.डी ला किती डॉक्टर आहेत.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

ओ.पी.डी. ला गायनोकोलॉजीस्ट मेडीसीन सर्जरी आहे, ऑर्थोपेडीक आहेत.

**वंदना पाटील :-**

मी सर्जरीचे बोलत नाही. किरकोळ पेशंट आहेत ते एक डॉक्टर किती पेशंट बघतो आणि आपले डॉक्टर किती आहेत.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

एक डॉक्टर ६०-७० रुग्ण बघायला लागतात.

**वंदना पाटील :-**

२ तासात डॉक्टर ६०-७० रुग्ण तपासू शकतो.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

आपले डॉक्टर पूर्ण ओ.पी.डी. तिथे काढतात. जे ऑनररी एन.यू.एच.एम. अंतर्गत घेतले आहेत त्यांना २ तासाचे बंधन आहे कारण त्यांना आपण २००० देतो.

**श्रीप्रकाश सिंह :-**

वंदना मॅडम का यह बोलना है अपने जो डॉक्टर है वह ओ.पी.डी. में कितने पेशंट चेक करते है।

**वंदना पाटील :-**

नही अपने कितने डॉक्टर है कितने पेशंट चेक करते है। मी परवाचे फोटो आणले आहेत. जे डॉक्टर आहेत त्यांना पेशंट चेक करायला बेड नाहीत.

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहेब तुम्ही स्वतः व्हिजीट करा.

**वंदना पाटील :-**

आम्ही एवढे बजेट पास करतो. तुम्ही फक्त ए.सी. मध्ये हवाच खायची का?

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

ह्याच्यामध्ये अडचण अशी आहे शासनाकडे हस्तांतरण झाल्यापासून..................

**वंदना पाटील :-**

३-३ महिन्यापासून डॉक्टरांना पगार नाही. जर आपण त्यांना २ तासासाठी बोलवतो आणि ७-८ तास आपण त्यांना बसवतो आणि जो मेंदूचा डॉक्टर तपासायला येतो त्याची फी किती असणार. त्यांना किती पगार देता आपण फक्त पास करायचे का? हे गरजेचे आहे. ह्या तपासणीसाठी आपल्याला नायरमध्ये जावे लागते. डॉक्टर जी औषध लिहून देतात ती औषध आपल्याकडे पाहिजेत ना. चार पेशंट पाठवले पण त्यांनी सांगितले औषध उपलब्ध नाही. बाहेरुन घ्या आपण जो पेपर देतो तो किती हलक्या दराचा आहे फक्त ठेके काढायचे का?

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

मॅडम तुम्ही जे दिले आहेत त्याच्यात फिजीशियन डॉक्टर मेल्वीन म्हणून आहेत त्यांचे वैशिष्ठ की ते पेशंटला १०-१५ मिनिट तपासतात. २.३०-३.०० पर्यंत त्यांची ओ.पी.डी. चालते.

**वंदना पाटील :-**

साहेब तुम्ही परत खोट बोलतो. जर एका पेशंटला १० मिनिट लागत असतील तर तो ७० पेशंट कसा तपासणार. उत्तर नीट द्या.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

मी सत्य माहितीच सांगतो. डॉ. मेलवीन एन.यू.एच.एम अंतर्गत ऑनररी येतात.

**वंदना पाटील :-**

मी डॉक्टरविषयी बोलत नाही. डॉक्टर खूप चांगले आहेत. डॉक्टर पेशंट किती तपासतात आणि डॉक्टर किती पाहिजेत तिथे किती पेशंट बसलेले आहेत.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

मॅडम हे फिजीशियन आहेत. आपल्याकडे फिजिशियनची वानवा आहे. वारंवार रिक्वेस्ट करुन ऑनररी आपण वैयक्तिक रिक्वेस्ट करुन हे डॉक्टर आले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**वंदना पाटील :-**

हॉस्पीटलमध्ये दोनच डॉक्टर आहेत. अर्जंट पेशंट आला तर ते वरती जातात आणि सगळे पेशंट तसेच लागलेले असतात. २००-३०० जण असतात. त्यांना एक तास दीड तास लागतो.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

मॅडम हे एन.यू.एच.एम. अंतर्गत डॉक्टर भरती केलेले आहेत. महापालिकेमार्फत भरती करण्यासाठी शासनाकडे हस्तांतरण झाल्यापासून हे केलेले आहे. आपले पण हात बांधलेले आहेत. ह्याच्यामध्ये आमचा पूर्ण प्रयत्न चालू असतो. त्या ठिकाणी आवश्यक सेवा उपलब्ध करुन दिल्या जातील.

**वंदना पाटील :-**

तिथे सेवाच नाही. तुम्ही त्या हॉस्पीटलमध्ये कधी गेलेला ते सांगा.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

आमचे तिथे नेहमी जाण असते. परवाच गेलो होतो.

**वंदना पाटील :-**

नेहमी जाण असते मग तुम्ही कसे सांगता. बघा किती गर्दी आहे. दोनच डॉक्टर बसतात त्याच्यात अर्जंट पेशंट आला की तो वरती जातो.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

आपल्याला फिजीशियन मिळत नाही.

**वंदना पाटील :-**

तुम्ही तसे सांगा की भेटत नाही. तुम्ही आज बोलता सर्व सेवा चालू आहेत.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

उपलब्ध ह्याच्यामध्ये जास्तीत जास्त सेवा देण्याचा प्रयत्न करतो. डॉक्टरांना सेवा देण्याचा रिक्वेस्ट करुन बोलू शकता.

**वंदना पाटील :-**

डॉक्टरजी औषध लिहून देतात ती औषध आपल्या पालिकेमध्ये उपलब्ध पाहिजेत.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

औषध उपलब्ध असतात बाहेरचे एन.यू.एच.एम. चे प्रॅक्टीस करणारे आहेत त्याची काही विशिष्ट औषध ते बाहेरुन देतात ती आपल्याकडे अव्हेलेबल नसतात. मेजोरीटी जी शासनामार्फत जी औषध ठेवणे आवश्यक आहेत ती औषध आपल्याकडे असतात.

**वंदना पाटील :-**

डॉक्टरांना विचारा तुम्ही काय लिहून देणार होते. पेशंट रिकव्हर आहे काय आहे.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

ठीक आहे मी आपल्या सूचनेनुसार तिथले उपलब्ध मनुष्यबळ पेशंटचा लोड ह्या सर्वांचा आढावा घेऊन प्रॉपर असे नियोजन करेन की रुग्णांना जास्त वेळ थांबावे लागणार नाही. प्रॉपर पुरेशी औषध मिळेन ह्याची मी काळजी घेईन.

**जुबेर इनामदार :-**

सत्ताधारी सत्ता असताना बोलतात म्हणजे किती लाजीरवाणी गोष्ट आहे. डॉक्टर साहेब शासनानी हे डॉक्टर ताब्यात घ्यायचे असा विषय झाल्यानंतर हे डॉक्टर आजच्या तारखेत महापालिकेच्या डॉक्टरांचे ऐकत नाही. महानगरपालिका प्रशासन त्यांना पगार देते. तरी ते ह्यांना उडवाउडवीची उत्तर देतात. त्यांना हा प्रकार लक्षात आला आहे की हे आमचे काही बिघडवू शकत नाही. डॉ. मेलवीन खरोखर अनुभवी डॉक्टर आहेत. ते

केबीनमध्ये २५-२५ पेशंट एकत्र घेतात आणि ते काम करतात. शल्यचिकित्सक आपल्याकडे १ किंवा दोनच आहेत. विषय असा आहे की ह्या परिस्थितीत प्रशासनाने काय भुमिका घेतली पाहिजे. त्या विषयावर आम्हाला घाणेरडा अनुभव आहे. पण काही पर्याय नाही. म्हणून आम्ही गप्प बसलो. डॉक्टर उघडपणे बोलत नाही पण ते डॉक्टर ह्यांचे ऐकत नाही. कुठेतरी वरिष्ठ अधिकाऱ्यांना ह्याच्यात हस्तक्षेप करायला लागेल. डॉक्टरांना घ्या त्यांना बसवा त्यांना चार प्रशासकीय शब्द ऐकवा तेव्हा कुठेतरी ते कामाला लागतील. वरुन खालपर्यंत पूर्ण स्टाफ निर्लज्ज स्टाफ आहे. साहेब आय.पी.डी. मध्ये पेशंटला ॲडमिशनच देत नाही. सरळ बोलतात तुम्ही सह्याद्रीला जा. आमच्याकडे सोय नाही आम्ही काहीच करु शकत नाही. आमच्याकडे सोनोग्राफी नाही, एक्सरे नाही आमची मशीन बंद आहे. सरळ उडवाउडवीची उत्तर देतात.

**वंदना पाटील :-**

प्रायव्हेट डॉक्टरांनी सांगितले की एक्सरे काढायचा आहे आणि पालिकेच्या हॉस्पीटलमध्ये जाऊन सांगितले तर तिकडचा स्टाफ सांगतो आम्हाला डॉक्टरांनी सांगितल्या शिवाय आम्ही एक्सरे काढणार नाही असे काय आहे का?

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

ओ.पी.डी. मध्ये दाखवून ओ.पी.डी. च्या डॉक्टरांनी दिल तरच त्या टेस्ट केल्या जातात. बाहेरुन रुग्ण येतील तर तो लोढ येईल. ते सांगतात ओ.पी.डी. च्या डॉक्टरांना दाखवा मग आम्ही काढू. बाहेरच्या डॉक्टरांनी दिले म्हणून डायरेक्ट नाही करु शकत. आपल्या डॉक्टरांना त्यांना दाखवायला लागेल.

**वंदना पाटील :-**

आपण करु शकत नाही का?

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

डायरेक्ट करु शकत नाही. मॅडम मी असे बोललो नाही की करणारच नाही. परंतु जे काही लिहून दिलेले आहे ते आपल्या ओ.पी.डी. च्या डॉक्टरांनी अप्रुव्ह करुन.................

**वंदना पाटील :-**

लोक तिकडे डॉक्टर दाखवायला गेले तर ते बोलले जिकडून लिहून आणले त्यांनाच दाखवा. त्यांनी चेक करायला नको का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

एखादा प्रायव्हेट डॉक्टर आहेत आणि मी त्यांच्याकडे गेलो. तर त्यांनी सांगितले मला शंका वाटते तर तुम्ही एक्सरे काढा आणि पालिकेच्या दवाखान्यात काढून या. एवढे प्रायव्हेट क्लिनिक आहेत प्रायव्हेट पॅथोलोजी लॅब्स आहेत. प्रायव्हेट रेडियोलॉजिस्ट ट्रस्ट असतात. प्रायव्हेट ॲक्टीव्हिटी वेगळी आहे महापालिकेच्या ओ.पी.डी. मध्ये बसलेले डॉक्टर असतील महापालिकेची सेवा गोरगरिबांसाठी उपलब्ध करुन दिलेले आहे तर जो कन्सन डॉक्टर आहे त्याला वाटले की अमूक गोष्टीसाठी एक्सरे काढणे गरजेचे आहे, एम.आर.आय करण्याची गरज आहे, सीटी स्कॅन करायची गरज आहे. जी फॅसिलीटी पालिकेच्या दवाखान्यात उपलब्ध आहे तर तो सांगेल तुम्ही तिकडे जाऊन एक्सरे काढा. ब्लड टेस्ट अव्हेलेबल आहेत त्या करुन घ्या. ह्या इथे अव्हेलेबल नाही तर तुम्ही प्रायव्हेटमध्ये करुन घ्या. परंतु प्रायव्हेट डॉक्टर सांगत असेल की एक्सरेची गरज आहे आणि तुम्ही सरकारी दवाखान्यात काढून आणा.

**वंदना पाटील :-**

साहेबांना फोटो दाखवा. साहेब ९ वाजल्यापासून गेलेले....................

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सर्वच प्रायव्हेट डॉक्टर पालिकेच्या दवाखान्यात पाठवायला लागले तर आपले एक्सरे सेंटरच तयार होईल ते कसे शक्य आहे.

**वंदना पाटील :-**

गरिबांनी प्रायव्हेट डॉक्टरकडे जायचे नाही का? फक्त पालिकेच्याच डॉक्टरकडे जायचे का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

त्यांनी कुठे जायचे तो त्याचा प्रश्न आहे. एखादा प्रायव्हेट डॉक्टर पालिकेच्या दवाखान्यात फुकट एक्सरे काढायला सांगेल ते कसे चालेल.

**वंदना पाटील :-**

फुकट आहे की तुम्ही चार्जेस घेता?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

चार्जेस असतील परंतु प्रायव्हेट पेक्षा आपले चार्जेस कमी असतील.

**वंदना पाटील :-**

पालिकेचे सर्वांना नाही फक्त गरिबांना आहे. श्रीमंताना नाही असे तुमचे म्हणणे आहे का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मी गरिब श्रीमंत तो विषय बोललो नव्हतो. पालिकेच्या हॉस्पीटलमध्ये बसलेला जो डॉक्टर रिकमेंड करतो की आपल्या हॉस्पीटलमध्ये एक्सरे काढण्याची गरज आहे तो आपण काढतो. आपण कधी नाही म्हटले.

**निला सोंस :-**

अधिकारी महोदय हॉस्पीटल में जुडी हुई हर व्यवस्था गरिब और गरजू लोगो के लिए है। लेकिन बाहर से किसीने प्रिस्क्रीप्शन दिया है और पालिका के हॉस्पीटल में आ रहे है तो फ्री और सस्ते के चक्कर में नही आऐंगे। जो अफॉर्ड नही करता वही हॉस्पीटल में आता है। तो जिसको गरज है तो वह एक्सरे की सर्विस ले या दवाईयों की ले ऐसा कोई कानून तो नही है। कानून के अंदर ऐसे रुल नही जो आप बोल रहे हो। आय वॅन्ट टू कम ओनली फॉर द एक्सरे डेफिनेटली में अफोर्ड नही कर सकती तो ही वहाँ जाऊंगी नही तो प्रायव्हेट डॉक्टर के पास जाऊंगी ऐसा कुछ कानुन नही है। जिससे आप बात कर रहे है हमारे डॉक्टर पेशंट अटेंड कर सके इतने पेशंट है और डॉक्टर रेशीयो कम है। डॉक्टर रेशीयो कम है इसके लिए पेशंट अटेंड नही कर पा रहे है। अगर बाहर का पेशंट आता है तो मिरा भाईंदर का नागरिक और अफॉर्ड नही कर सकता और एक्सरे लेना चाहता है तो हमको नही लगता की हमारे पास एक्सरे की मशीन है और वो चल रही है। तो हम सेवा देने के लिए है और सेवा देनी है।

**मा. सभापती :-**

डॉक्टर साहेब आपण मा. महापौरांकडे ह्या विषयासाठी एक वेगळी मिटींग लावूया. हॉस्पीटलमध्ये काय सुविधा आहे त्याचा तुम्ही सुध्दा आढावा घ्या. आपण चर्चा करु.

**जुबेर इनामदार :-**

सभेमध्ये उत्तर देणार होते. सभा संपली विषय संपला. सचिव साहेब त्या मिटींगमध्ये तसे काही ठरले नव्हते की पुढच्या सभेमध्ये घेऊ. गोषवा-यासहीत विषय आणा.

**मा. सभापती :-**

गोषवा-यासहीत विषय घेण्यात येईल.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४५, **नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान सुस्थितीत करणेबाबत.**

**श्रीप्रकाश सिंह :-**

मा. सभापती साहेब क्या सुशोभिकरण करनेवाले है उसकी जानकारी दो।

**वर्षा भानुशाली :-**

स्टॅन्डिंग के मिटींग में डिपार्टमेंट के लोग क्यों नही आते है।

**राजीव मेहरा :-**

मा. सभापती महोदय सृष्टी कॉम्पलेक्स सेक्टर ५ वहाँ से लेटर दिया है वह पैसे देने के लिए तयार है। उधर धोकादायक झाड है में मेश्राम साहब को १५ दिन पहले खूद लेके गया था दो दिन का टाईम दो उस दिन रथयात्रा थी। वो बोले रथयात्रा चल रही है उसके बाद में करुंगा। आज सुबह तक काम नही हुआ। कमिशनर साहब कुछ डिपार्टमेंट के लोग हमारी सुनते ही नही।

**श्रीप्रकाश सिंह :-**

वृक्ष प्राधिकरण के किसी भी अधिकारी को फोन किया तो भेजते है ऐसा बोलते है। उसके बाद गाडी खराब हो जाती है।

**मा. सभापती :-**

कमिशनर साहेब पूढच्या मिटींगमध्ये ह्या दोन्ही अधिका-यांना बोलवून घ्या.

**वर्षा भानुशाली :-**

दोघांना सस्पेंड करा आणि नविन आणा.

**राजीव मेहरा :-**

शितल नगर में एक बिल्डींग है गटर के बाजू में एक पिपल का झाड है उसकी जडे बिल्डींग के वॉटर टँक तक जा रही है। एक इन्सान कभी बोलता है तोडने का, कभी बोलता है नही तोडने का। आप लोगो के हेल्थ के साथ खेल रहे हो।

(सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, **मोफत टँकरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्याबाबत फेरविचार करणे.**

**राकेश शाह :-**

मा.स्थायी समिती सभा दि.३१/१०/२००१ ठराव क्र.४०९ अन्वये मिरा-भाईंदर क्षेत्रातील आदिवासी पाडे, धार्मिक स्थळे, धार्मिक कार्यक्रम व अशुध्द पाणी पुरवठा होणा-या इमारती इ. ठिकाणी झोपडपट्टी परिसरातील रहिवाश्यांच्या व लोकप्रतिनिधी यांच्या मागणी नुसार टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा केला जात आहे. मा. स्थायी समिती सभा दि. २७/११/२०१८ ठराव क्र. ११२ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी परिसरात मोफत टँकर देण्याची आवश्यकता नसलेबाबत ठराव पारित झालेला आहे.

मा. स्थायी समिती सभा दि.१६/०८/२०१८ ठराव क्र.४९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना आवश्यकतेनुसार प्रति टँकर रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारुन टँकर पुरवठा करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील आदिवासी पाडे, धार्मिक स्थळे, धार्मिक कार्यक्रम यांना मोफत टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे व महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी परिसरात प्रति टँकर रु.५००/- शुल्क आकारण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

झोपडपट्टी वाल्याकडून ५०० रुपये जमा कसे करायचे त्याचे मला उत्तर द्या. हा प्रशासनाचा गोषवारा आहे.

**मा. सभापती :-**

१००० रुपयाचे ५०० केले ना.

**जुबेर इनामदार :-**

झोपडपट्टीला शुल्क आकारत नव्हतो. फुकट देत होतो. निःशुल्क होते. धार्मिक स्थळ झोपडपट्टी निःशुल्क.

**मा. सभापती :-**

आपण ठराव केला होता १००० रुपये आता त्याचे ५०० रुपये केले.

**जुबेर इनामदार :-**

धार्मिक स्थळाला निःशुल्क होते. आदिवासी पाडे, धार्मिक कार्यक्रम टँकरद्वारे क्षेत्रातील झोपडपट्टी परिवार निःशुल्क करा. आम्ही १००० रुपये केले आम्ही कुठेतरी चुकलो त्याचा सुधार करा. धार्मिक स्थळाचे धार्मिक कार्यक्रमाचे तुम्ही पैसे घेणार झोपडपट्टीमध्ये पैसे घ्यायला गेले तर पैसे काढणार कसे. आदिवासी पाड्यामधून पैसे घेणार ते लोक डब्यामधून पाणी जमा करतात.

**अनिता पाटील :-**

आदिवासी पाड्याला फुकट आहे.

**जुबेर इनामदार :-**

इकडे ५०० रुपये लावले आहेत.

**सुरेश वाकोडे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने आपण धार्मिक स्थळे आदिवासी पाडे ह्याच्यासाठी निःशुल्क आहे. आपण २७.११.२०१८ ला ठराव केला होता त्याच्यामध्ये आदिवासी पाडे आणि धार्मिक स्थळ हे वगळून जे टँकर घेऊन जातात त्यांना १००० रुपये चार्ज करत होतो. आता आपण काय करतो झोपडपट्टीमध्ये कोणाला टँकर पाहिजे असेल तर त्यांना ५०० रुपये पावती फाडून टँकर देऊ असा ठराव प्रस्तावित केलेला आहे.

**वर्षा भानुशाली :-**

मा. सभापती साहेब कोण अधिकारी येत नाही. पुढच्या मिटींगला सर्व विभागाचे अधिकारी आले नाही तर आम्ही येणार नाही. कालच एम.टी.एन.एल. ऑफिस बी.के.सी. मध्ये आग लागली होती. १०० लोक

अटकले होते. आम्ही स्थानिक नगसेवक पत्रव्यवहार करताना काही उत्तर देत नाही आणि त्याला फायरची परवानगी कोण देते ही काय पध्दत आहे. उद्या जर आग लागली तर खेळायची वस्तू आहे का? कमला मीलचे, सुरतचे उदाहरण घ्या.

**मा. सभापती :-**

ही कुठली जागा आहे?

**वर्षा भानुशाली :-**

बी.के.सी. मध्ये काल तुम्ही न्यूजमध्ये बघितले असेल.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे काय आहे.

**वर्षा भानुशाली :-**

माझ्या प्रभागामध्ये ४-५ वेळा पत्र टाकलेले आहे. मौजे भाईंदर सर्व्हे नं. जूना ८४, नविन ३७७ मीटर कमीत कमी ६ महिने झाले. पत्रव्यवहार करत आहे. मला ह्याचे उत्तर सुध्दा दिलेले नाही. फायरची गाडी फिरु शकत नाही. तिकडे जागा पण नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही ती कॉपी द्या.

**वर्षा भानुशाली :-**

१० वेळा कॉपी दिली आहे मला उत्तर द्या.

**मा. सभापती :-**

उत्तर देणारे अधिकारी इथे नाहीत.

**वर्षा भानुशाली :-**

सभापती साहेब त्यांना बोलवा मी बसते.

**मा. सभापती :-**

मॅडम स्टॅन्डिंगमध्ये फायरचा विषय नव्हता.

**प्रकरण क्र. ४६ :-**

**मोफत टँकरद्वारे होणाऱ्या पाणी पुरवठ्याबाबत फेरविचार करणे.**

**ठराव क्र. ४० :-**

मा.स्थायी समिती सभा दि.३१/१०/२००१ ठराव क्र.४०९ अन्वये मिरा-भाईंदर क्षेत्रातील आदिवासी पाडे, धार्मिक स्थळे, धार्मिक कार्यक्रम व अशुद्ध पाणी पुरवठा होणा-या इमारती इ. ठिकाणी झोपडपट्टी परिसरातील रहिवाश्यांच्या व लोकप्रतिनिधी यांच्या मागणी नुसार टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा केला जात आहे. मा. स्थायी समिती सभा दि. २७/११/२०१८ ठराव क्र. ११२ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी परिसरात मोफत टँकर देण्याची आवश्यकता नसलेबाबत ठराव पारित झालेला आहे.

मा. स्थायी समिती सभा दि.१६/०८/२०१८ ठराव क्र.४९ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना आवश्यकतेनुसार प्रति टँकर रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारुन टँकर पुरवठा करण्यात येत आहे. महानगरपालिका क्षेत्रातील आदिवासी पाडे, धार्मिक स्थळे, धार्मिक कार्यक्रम यांना मोफत टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे व महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी परिसरात प्रति टँकर रु.५००/- शुल्क आकारण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्रीम. वर्षा भानुशाली**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (ए) मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ, आरक्षण क्र. १८४ व (बी) मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर स्कॉयवॉक खाली (सबस्टेशन व स्कायवॉक लँडींग जवळ) पे ॲन्ड पार्क येथे मनपाने निश्चित केलेल्या दराने निविदा मागविणेबाबत मान्यता मिळणेबाबत**

**राकेश शाह :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कंत्राट पध्दतीने विविध पार्किंच्या ठिकाणांच्या क्षमतेबाबत तफावतीचे वस्तुस्थिती सादर केलेली आहे.

अ) भाईंदर (पश्चिम), स्टेशन स्काय वॉक येथे दुचाकी वाहने उभ्या राहण्याच्या क्षमतेची पुन:श्च मोजमाप केले असता **106** दुचाकी वाहने उभ्या राहू शकतात याबाबत मा. कार्यकारी अभियंता यांचा अहवाल.

ब) मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.**264** अ या पार्किंग आरक्षणाच्या जागेत तळ मजला **44** व पहिल्या मजल्यावर **66** वाहने उभी राहण्याची क्षमता आहे. मा. महासभेने सदर पार्किंग आरक्षणाच्या तळ मजल्यावर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्यासाठी मंजुरी दिल्याने सदर ठिकाणी मार्केट सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर पार्किंग करीता आरक्षणात फक्त पहिल्या मजल्यावर **66** वाहने उभी राहु शकतात याबाबत मा. कार्यकारी अभियंता यांचा अहवाल.

क) मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.**184** येथे दुचाकी **1550** व स्काय वॉय समांतर खाली **180** दुचाकी वाहने असे एकूण **1730** दुचाकी वाहने चालविणेकरीता निविदा काढण्यात आली होती.

यापुर्वी पाहणी केली असता मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** येथे दुचाकी **1645** व स्काय वॉय समांतर खाली **180** दुचाकी वाहने असे एकूण **1825** दुचाकी वाहने उभी राहु शकत असल्याबाबत सर्वेक्षण अहवाल दिला होता. सदर वाहनतळ आरक्षणाच्या अहवालानुसार **01** वर्षाकरीता मुल्यधारित रक्कम रु **1,26,68,000/-** (अक्षरी एक कोटी सव्वीस लाख अडुसष्ठ हजार मात्र) होत असून **3** वर्षाकरीता मुल्यधारीत रक्कम रु.**3,80,05,500/-** (अक्षरी तीन कोटी ऐंशी लाख पाच हजार पाचशे मात्र) आहे.

सद्यस्थितीत मिरा रोड स्टेशनचे सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. सदर सुशोभीकरण काम व रस्ता रुंदीकरण कामांतर्गत आरक्षण क्र.**184** मधील जागा कमी होऊन **30** मीटर व **18** मीटर रस्ता रुंदीकरण व रेल्वे स्टेशन सुशोभीकरण करण्यात पार्कींगची जागा कमी झालेली आहे. सदर जागेचे पुन्हा मोजमाप घेतले असता सदर ठिकाणी खालीलप्रमाणे दुचाकी वाहने उभी राहू शकतात.

| | | |
|---|---|---|
| आरक्षण क्र.**184** | - | **1200** (दुचाकी वाहने) |
| स्कायवॉक खाली | - | **146** (दुचाकी वाहने) |
| एकुण | - | **1346** (दुचाकी वाहने) |

बांधकाम विभागाने मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** व स्काय वॉक समांतर खाली आरक्षणाची वरील प्रमाणे पुन:श्च पाहणी केल्यानुसार सदर वाहनतळ आरक्षणाच्या अहवालानुसार वार्षिक मुल्यधारित रक्कम रु. **91,71,800/-** (अक्षरी ऐक्याण्णव लाख एकाहत्तर हजार आठशे रुपये) होत असुन **3** वर्षाकरीता मुल्यधारीत रक्कम रु.**2,75,15,400/-** (अक्षरी दोन कोटी पंचाहत्तर लाख पंधरा हजार चारशे मात्र) आहे. तरी तीन वार्षिक मुल्यधारीत रक्कमेच्या निविदा करीता मान्यता मिळावी.

वरीलप्रमाणे भाईंदर (पश्चिम), स्टेशन स्काय वॉक व मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.**264** अ या वाहनतळ आरक्षणातच्या मुल्यधारीत वाहन क्षमतेत कोणताही बदल सुचवले नाहीत त्यामुळे रक्कमेच्या तफावतीमध्ये कोणताही बदल झालेला नसुन त्यांचे मुल्यधारीत रक्कम मंजुर करणे उचित होईल.

तसेच (क) मध्ये नमुद केल्याप्रमाणे मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** व स्काय वॉय समांतर खाली यापूर्वी केलेल्या मुल्यधारीत रक्कमेत व सदर वाहनतळ आरक्षणावर सद्यस्थितीत अहवालानुसार मागील वर्षाच्या तुलनेत केलेल्या मुल्यधारीत रक्कमेत तफावत दिसुन येत आहे. त्यामुळे (अ) मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** व (ब) स्काय वॉय समांतर खाली आरक्षणाच्या मुल्यधारीत रक्कम मागील वर्षाच्या निविदेच्या मुल्याधारीत रक्कमेपेक्षा वाहन सक्षमतेत बदल झाल्याने तुलनात्मक दृष्ट्या मुल्याधारीत रक्कम कमी आहे. तरी सन **2019-20**, सन **2020-21** ते सन **2021-22** या तीन वर्षाकरीता पे ॲण्ड पार्क

वाहनतळ ठेकापध्दतीने चालविण्याबाबत निविदा काढणेकरीता मुल्याधारीत केलेली रक्कमेचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे असून ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

तुलनात्मक तक्ता

| सन | भाईंदर (पश्चिम), स्टेशन स्काय वॉय (क्षमता- 106 दुचाकी) | (अ) मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.184 (क्षमता- 1550 दुचाकी) (ब) स्काय वॉय समांतर खाली (क्षमता- 180 दुचाकी) | मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.264 (अ) (क्षमता- 100 चारचाकी) |
|---|---|---|---|
| 2016-17 | रु.3,71,424/- | रु.76,26,912/- | रु.4,35,996/- |
| 2017-18 | रु.4,27,140/- | रु.76,26,912/- | रु.5,33,820/- |
| 2018-19 | रु.4,91,436/- | रु.1,42,50,000/- | रु.6,53,904/- |
| | भाईंदर (पश्चिम), स्टेशन स्काय वॉय (क्षमता- 106 दुचाकी) | (अ) मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.184 (क्षमता- 1200 दुचाकी) (ब) स्काय वॉय समांतर खाली (क्षमता- 146 दुचाकी) एकुण-1346 | मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.264 (अ) (क्षमता- 66 चारचाकी) |
| 2019-20 | रु.5,19,800/- | रु.91,71,800/- | रु.16,63,200/- |
| 2019-22 (3 वर्षाकरीता) | रु.15,59,400/- | रु.2,75,15,400/- | रु.50,19,600/- |

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हा विषय थोडक्यात समजावून सांगा.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रामध्ये एकूण ३ ठिकाणी पार्किंग आहे. त्याच्यामध्ये मिरारोड पूर्व आरक्षण क्र. २६४ मिरारोड पूर्व आरक्षण क्र. १८४ आणि भाईंदर (प.) हे ३ आहेत. भाईंदर (प.) कॅपेसिटी १०६ ची आहे. मिरारोड पूर्व आरक्षण क्र. २६४ ह्याची कॅपेसिटी स्टार मार्केटची ग्राऊंड प्लस वन आहे. पहिला माळा आणि दुसरा माळा असे आहे. आपण पहिल्या माळ्यावर तात्पुरते मार्केट असे प्रस्तावित केले आहे. मिरारोड पूर्व आरक्षण क्र. ६४ हे मोठे आरक्षण आहे. तिथे मागील वर्षी टेंडर कॉल केले होते. त्याची अमाऊन्ट १ कोटी ३६ लाख होते त्या अगोदर ७२ लाख होती. परंतु वाढलेली एरिया आणि वाढलेले दर त्याप्रमाणे आपण दिले होते. परंतु रेल्वे स्टेशनचे सुंदरीकरण आणि रोड वायडींग ह्याच्यामधली कॅपेसिटी कमी झालेली आहे. त्यामुळे वारंवार येणाऱ्या तक्रारी आणि संबंधित ठेकेदार ह्यांना ते परवडत नसल्यामुळे तो ठेका आपण रद्द केलेला आहे. आणि परत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता ह्यांच्याकडून व्हॅल्यूएशन करुन घेतले किती गाळ्याची कॅपेसिटी आहे त्याप्रमाणे नविन निविदा कॉल करतो. ती मुल्य रक्कम आहे त्याचा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवला आहे.

**जुबेर इनामदार :-**

जुनी निविदा होती ती कुठल्या वर्षापर्यंत होती.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

१९.३.१९ पर्यंत रद्द केलेली आहे आणि आपण त्याचा ताबा घेतलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

कधीपर्यंत तशी होती.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

एक वर्षाची मुदत होती.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही रद्द केली ती संपली नाही.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

नाही आपण रद्द केली.

**जुबरे इनामदार :-**

कधीपर्यंत होती. २०२० पर्यंत होती. किती महिने किंवा वर्षा आधी रद्द केली.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

पहिल्या ३-४ महिन्यातच रद्द केली. श्रृती एन्टरप्रायझेस ह्या ठेकेदारास डिसेंबर २०१८ पासून आपण निविदा दिली होती.

**जुबेर इनामदार :-**

कधी पर्यंत होती.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

१ वर्षासाठी होती.

**जुबेर इनामदार :-**

डिसेंबर २०१८ ते डिसेंबर २०१९ ला संपली असती.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

निविदा कितीमध्ये दिली होती.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

१ कोटी ४२ लक्ष ५० हजार रुपये.

**जुबेर इनामदार :-**

आता ती ९१ वर येईल.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

साहेब आता ऐका २०१८ ते २०१९. मिरारोड स्टेशन सुशोभिकरण २०१७ ला संपले आहे. म्हणजे ज्या निविदाकारांनी ह्या निविदा भरल्या असतील त्या त्यांनी सुशोभिकरण संपल्यानंतर जागा तोकडी झाली, कमी गाड्या उभ्या राहणार त्याची त्याला जाणीव आहे. सुशोभिकरणाचे काम २०१७ ला संपुष्टात आले. त्या काळामध्ये जितकी जागा उरली तितकीच उरली. २०१८ ला जेव्हा निविदा प्रक्रिया झाली ज्यांनी निविदा भरली तेव्हा त्या ठेकेदाराला माहित असेल की जागा कमी उरली तर कमी गाड्या उभ्या राहतील. तुम्ही त्याचा अरनेटस्मती घेतला असेल तो तुमच्याकडे आला नंतर मला परवडत नाही. गाड्या कमी उभ्या राहतात. तुम्ही त्याची बँक गॅरन्टी घेतली आहे. कॉन्सीस्टेट केली का? रद्द का केली? ती रद्द केली की तुम्ही त्याची बँक गॅरेन्टी घेतली.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

ती अद्याप रद्द केलेली नाही. आपण बँकेला पत्र दिलेले आहे की रक्कम रिलीज करुन घेणे.

**जुबेर इनामदार :-**

रद्द केली नाही सर ह्याच्या आधी सांगितले की रद्द केली.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

बँक गॅरेन्टी रिलीज करु नये म्हणून आपण बँकेला पत्र दिले.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

निविदा रद्द केली बँक गॅरेन्टी रिलीज केलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्हाला त्याच्याकडून बँक गॅरेन्टी घ्यायची आहे त्यामुळे तुम्हाला रिलीज करता येणार नाही. कारण तुम्ही त्याच्या बोलण्यावरून रद्द करता. तक्रारी आल्या म्हणून तुम्ही रद्द करता.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

ही रक्कम घ्यायला पाहिजे. त्यापेक्षा जास्त रक्कम घेतली म्हणून काही कार्यकर्त्यांच्या वारंवार तक्रारी होत्या त्या तक्रारीच्या अनुषंगाने खातरजमा केली त्यांनी जास्त पैसे घेतले हे सिध्द झाले म्हणून आपण त्यांना............

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही त्याची ह्या विषयावर हेयरिंग घेतली असेल. त्याचे काय म्हणणे आहे.

**दिपक पुजारी (मा. उपायुक्त) :-**

त्यांचे म्हणणे असे आहे की जी कॅपेसिटी आहे ती कमी आहे आणि मला तिथे परवडत नाही परंतु त्या गोष्टी आपण ग्राह्य धरल्या नाहीत.

**जुबेर इनामदार :-**

कधीही निविदा काढताना तुमचे एस्कलेशन म्हणजे पालिकेचा रेव्हेन्यू लॉस नाही झाला पाहिजे. ह्या विषयावर त्या दृष्टीकोनातून विचार करायला पाहिजे. इथे तो का घेत होता. त्यांनी घेतले तेव्हा निविदा भरल्या. त्या १ कोटी ४२ लाखाच्या निविदा भरल्या आहेत. त्याच्यापेक्षा आम्ही सरळ कमीत कमी ही केम डाऊन ५० टक्के कमी आम्ही मुल्यांकन करायला गेलो पालिकेची एवढी मेअर.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ठेकेदारावर मेहरबानीचा विषय नाही. मागच्या वेळेस १ कोटी ४२ लाखाची जी निविदा होती ती कॉन्ट्रॅक्टरनी दिलेली ऑफर होती...........

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यापेक्षा आम्ही कमी का करतो १ कोटी ४२ लाखावरच निविदा काढताना स्टिक अप राहायला पाहिजे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

साहेब आपल्याकडे एक एक्स जागा आहे आपण त्या ठिकाणी वाहनांचे दर ठरवून दिलेले आहेत. जर जागेमध्ये वाढ झाली नाही त्याचा २४ तास आणि १२ तासाच्या दरामध्ये वाढ झाली नाही तर निविदा रकमेत वाढ कशी होईल. साहजिक त्याला जास्त पैसे घ्यायला लागतील. १० टक्के वाढ आपण कधी धरतो. प्राइज एस्कलेशनमध्ये आपण जकात काढत नव्हतो. जकातीमध्ये कसे आहे नविन लोकसंख्येमध्ये भर पडणार आहे. नविन बांधकाम होणार आहेत, वस्तूचे दर वाढणार आहेत. आपले ह्या ठिकाणी जर १०० गाड्या उभ्या राहणार असतील तर १०० च गाड्या उभ्या राहणार आणि आपले शहर असे नाही की मार्केटमध्ये माणूस आला वाहन उभे करुन दोन तासात निघून गेला आणि १५ मिनिटांनी दुसरा माणूस आला. आपली पॉप्युलेशन शहरामधून मुंबईकडे कामासाठी जाणारी आहे सर्व साधारण शहराचे तसे ट्रेंड आहे. एखाद्याने सकाळी दुचाकी वाहन लावले तर तो संध्याकाळी ८ ते ९ वाजता वाहन काढणार. नंतर रात्री ९ वाजता कोण वाहन लावून जाणार नाही. त्या माध्यमातून पैसे मिळण्याची शक्यता नाही. मग अशा वेळेस वाढीव रक्कमेची अपेक्षा ठेवली तर साहजीकच कोणीतरी कॉम्पीटेशन रेटमध्ये जास्तीची ऑफर देणार त्यामुळे नागरिकांची पिळवणूक होण्याची शक्यता जास्त बळावते. त्यामुळे आपला दर आपली वस्तुस्थिती, आपली जागा ह्या सर्वांचा विचार करता रेट रिझनेबल असला पाहिजे आणि कॉन्ट्रॅक्टरनी नागरिकांना चांगली वागणूक देऊन ठराविक दरानेच त्याच्याकडून पैसे वसूल केले पाहिजे असे माझे प्रांजळ मत आहे.

**जुबेर इनामदार :-**

आपला दुचाकीचा दर किती आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये ठरावामधून एक गोष्ट समोर आली आहे ती म्हणजे आपण १२ तास आणि २४ तासाचे वेगवेगळे दर ठेवले आहेत. २४ तासासाठी आपल्याकडे कोण वाहन लावेल.

**जुबेर इनामदार :-**

मॅक्झीमम लोकांनी पासेस काढले आहेत. त्याच्यामध्ये सायकल सोडून देतो फोर व्हिलर लावले जाते आपण दुचाकीच पकडतो.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

नाही सगळ्यांचेच पकडतो. पण ज्यांचे मंथली पास आहेत ९० टक्के लोक मंथली पासवाले असतील तर विषय संपला. बाकी उरलेल्या १० टक्केमध्ये व्हेरीएशन किती असणार.

**जुबेर इनामदार :-**

टू व्हिलरवर मुंबईला जाणारी लोक आहेत तेच पार्क करतात आणि पार्क करणारी मॅक्झीमम पासेसवाले आहेत.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मग पासची रक्कम तासाप्रमाणे कॅल्क्युलेट केली त्यापेक्षा कमी आहे. त्यामधून पैसे कमीच मिळणार. मग कॉम्पीटेटीव्ह रेटनी जास्त पैसे भरले असतील ना. उलट आपल्याला ह्यालाच चेक लावला पाहिजे. कोणी म्हणत असेल की मी तुम्ही ९० लाखाऐवजी १.२५ कोटी देणार आहे तर कसा देणार? तो कूठून वसूल करणार? म्हणजे तो नागरिकांची पिळवणूक करणार? मग वारंवार तुमच्याकडे आमच्याकडे तक्रारी येणार. आपण त्याच्यावर कारवाई करणार. आपले कर्मचारी नेमायला गेले तर त्याच्यावर वॉचच राहणार नाही. आपल्याला जेवढी रक्कम यायची तेवढी सुध्दा आपल्या कर्मचाऱ्याच्या माध्यमातून येत नाही असा अनुभव आहे म्हणून आपण ठेके पध्दतीने देतो. ते रेट रिझनेबल असले पाहिजेत असे प्रशासनाने मत आहे.

**जुबेर इनामदार :-**

जुन्या ठेकेदाराची बँक गॅरन्टी सिस करुन ठेवलेली आहे त्याला रिलीज करायला दिली नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ती सिस आहे. त्यांची मागणी आहे ती रिलीज करा. त्यांचे म्हणणे आहे की तुम्ही एवढी जागा द्यायला पाहिजे होती. ती ताब्यात दिली नाही हा कॉन्ट्रवर्सीचा भाग आहे सध्या आपण रिलीज केली नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तसे करता कामा नये कारण २०१८-१९ ला निविदा प्रक्रियामध्ये भाग घेतला होता तेव्हा त्यांनी त्याच्यासमोर असलेली जागा त्याच्यावर त्यांनी ते दर भरलेले म्हणजे त्याच्यात पालिका प्रशासन कुठे चुकलेले नाही. त्याची अरनेस्टमनी बँक गॅरेन्टी सिस केलीच पाहिजे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

बांधकाम विभागामार्फत नविन मेझरमेन्ट करुन घेतले की किती वाहने उभी राहणार आहेत. ह्याच्यामध्ये खरच किती रक्कम येणार ते सांगू ५-२५ लाखाने फरक नाही पडणार पण २५ लाखासाठी नागरिकांची पिळवणूक होईल.

**जुबेर इनामदार :-**

हे एक्सप्लेनेशन पटले परंतु ठेकेदाराची बँक गॅरन्टी सिस केली आहे ती सोडता कामा नये ह्याचा अहवाल स्थायी समितीला सादर करा.

**राजीव मेहरा :-**

मा. सभापती महोदय फोर व्हिलर का मन्थली रेट क्या बताया।

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ४७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील (ए) मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ, आरक्षण क्र. १८४ व (बी) मिरारोड रेल्वे स्टेशन समांतर स्कॉयवॉक खाली (सबस्टेशन व स्कायवॉक लँडींग जवळ ) पे ॲन्ड पार्क येथे मनपाने निश्चित केलेल्या दराने निविदा मागविणेबाबत मान्यता मिळणेबाबत**

**ठराव क्र. ४१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील कंत्राट पध्दतीने विविध पार्किंच्या ठिकाणांच्या क्षमतेबाबत तफावतीचे वस्तुस्थिती सादर केलेली आहे.

अ) भाईंदर (पश्चिम), स्टेशन स्काय वॉक येथे दुचाकी वाहने उभ्या राहण्याच्या क्षमतेची पुन:श्च मोजमाप केले असता 106 दुचाकी वाहने उभ्या राहू शकतात याबाबत मा. कार्यकारी अभियंता यांचा अहवाल.

ब) मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.264 अ या पार्किंग आरक्षणाच्या जागेत तळ मजला 44 व पहिल्या मजल्यावर 66 वाहने उभी राहण्याची क्षमता आहे. मा. महासभेने सदर पार्किंग आरक्षणाच्या तळ मजल्यावर तात्पुरत्या स्वरुपात मार्केट सुरु करण्यासाठी मंजुरी दिल्याने सदर ठिकाणी मार्केट सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर पार्किंग करीता आरक्षणात फक्त पहिल्या मजल्यावर 66 वाहने उभी राहु शकतात याबाबत मा. कार्यकारी अभियंता यांचा अहवाल.

क) मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.**184** येथे दुचाकी **1550** व स्काय वॉय समांतर खाली **180** दुचाकी वाहने असे एकूण **1730** दुचाकी वाहने चालविणेकरीता निविदा काढण्यात आली होती.

यापुर्वी पाहणी केली असता मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** येथे दुचाकी **1645** व स्काय वॉय समांतर खाली **180** दुचाकी वाहने असे एकूण **1825** दुचाकी वाहने उभी राहु शकत असल्याबाबत सर्वेक्षण अहवाल दिला होता. सदर वाहनतळ आरक्षणाच्या अहवालानुसार **01** वर्षाकरीता मुल्यधारित रक्कम रु **1,26,68,000/-** (अक्षरी एक कोटी सव्वीस लाख अडुसष्ठ हजार मात्र) होत असून **3** वर्षाकरीता मुल्यधारीत रक्कम रु.**3,80,05,500/-** (अक्षरी तीन कोटी ऐंशी लाख पाच हजार पाचशे मात्र) आहे.

सद्यस्थितीत मिरा रोड स्टेशनचे सुशोभीकरणाचे काम हाती घेण्यात आले होते. सदर सुशोभीकरण काम व रस्ता रुंदीकरण कामांतर्गत आरक्षण क्र.**184** मधील जागा कमी होऊन **30** मीटर व **18** मीटर रस्ता रुंदीकरण व रेल्वे स्टेशन सुशोभीकरण करण्यात पार्कींगची जागा कमी झालेली आहे. सदर जागेचे पुन्हा मोजमाप घेतले असता सदर ठिकाणी खालीलप्रमाणे दुचाकी वाहने उभी राहू शकतात.

| | | |
|---|---|---|
| आरक्षण क्र.**184** | - | **1200** (दुचाकी वाहने) |
| स्कायवॉक खाली | - | **146** (दुचाकी वाहने) |
| एकुण | - | **1346** (दुचाकी वाहने) |

बांधकाम विभागाने मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** व स्काय वॉक समांतर खाली आरक्षणाची वरील प्रमाणे पुन:श्च पाहणी केल्यानुसार सदर वाहनतळ आरक्षणाच्या अहवालानुसार वार्षिक मुल्यधारित रक्कम रु. **91,71,800/-** (अक्षरी ऐक्याण्णव लाख एकाहत्तर हजार आठशे रुपये) होत असुन **3** वर्षाकरीता मुल्यधारीत रक्कम रु.**2,75,15,400/-** (अक्षरी दोन कोटी पंचाहत्तर लाख पंधरा हजार चारशे मात्र) आहे. तरी तीन वार्षिक मुल्यधारीत रक्कमेच्या निविदा करीता मान्यता मिळावी.

वरीलप्रमाणे भाईंदर (पश्चिम), स्टेशन स्काय वॉक व मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.**264** अ या वाहनतळ आरक्षणातच्या मुल्यधारीत वाहन क्षमतेत कोणताही बदल सुचवले नाहीत त्यामुळे रक्कमेच्या तफावतीमध्ये कोणताही बदल झालेला नसुन त्यांचे मुल्यधारीत रक्कम मंजुर करणे उचित होईल.

तसेच (क) मध्ये नमुद केल्याप्रमाणे मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** व स्काय वॉय समांतर खाली यापूर्वी केलेल्या मुल्यधारीत रक्कमेत व सदर वाहनतळ आरक्षणावर सद्यस्थितीत अहवालानुसार मागील वर्षाच्या तुलनेत केलेल्या मुल्यधारीत रक्कमेत तफावत दिसुन येत आहे. त्यामुळे (अ) मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** व (ब) स्काय वॉय समांतर खाली आरक्षणाच्या मुल्यधारीत रक्कम मागील वर्षाच्या निविदेच्या मुल्याधारीत रक्कमेपेक्षा वाहन सक्षमतेत बदल झाल्याने तुलनात्मक दृष्ट्या मुल्याधारीत रक्कम कमी आहे. तरी सन **2019-20**, सन **2020-21** ते सन **2021-22** या तीन वर्षाकरीता पे ॲण्ड पार्क वाहनतळ ठेकापध्दतीने चालविण्याबाबत निविदा काढणेकरीता मुल्याधारीत केलेली रक्कमेचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे असून ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

तुलनात्मक तक्ता

| सन | भाईंदर (पश्चिम), स्टेशन स्काय वॉय (क्षमता- **106** दुचाकी) | (आ) मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.**184** (क्षमता- **1550** दुचाकी) (ब) स्काय वॉय समांतर खाली (क्षमता- **180** दुचाकी) | मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.**264** (अ) (क्षमता- **100** चारचाकी) |
|---|---|---|---|
| **2016-17** | रु.**3,71,424/-** | रु.**76,26,912/-** | रु.**4,35,996/-** |
| **2017-18** | रु.**4,27,140/-** | रु.**76,26,912/-** | रु.**5,33,820/-** |

| | | | |
|---|---|---|---|
| 2018-19 | रु.4,91,436/- | रु.1,42,50,000/- | रु.6,53,904/- |
| | भाईंदर (पश्चिम), स्टेशन स्काय वॉय (क्षमता- 106 दुचाकी) | (आ) मिरा रोड, रेल्वे स्टेशन (पुर्व), आरक्षण क्र.184 (क्षमता- 1200 दुचाकी) (ब) स्काय वॉय समांतर खाली (क्षमता- 146 दुचाकी) एकुण-1346 | मिरा रोड (पुर्व), आरक्षण क्र.264 (अ) (क्षमता- 66 चारचाकी) |
| 2019-20 | रु.5,19,800/- | रु.91,71,800/- | रु.16,63,200/- |
| 2019-22 (3 वर्षाकरीता) | रु.15,59,400/- | रु.2,75,15,400/- | रु.50,19,600/- |

**सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, **निविदेस मान्यता मिळणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)**

**मोहन म्हात्रे :-**

| अ.क्र | टेंडर आय डी | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | 442615_1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले यावर विविध झाकणे बसविणे (वार्षिक निविदा)<br><br>मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा प्रोजेक्ट<br><br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. रिध्दीका इंटरप्रायझेस | रु.१,३३,९२,८५७/-<br><br>९.००००% जास्त दराने दरवाटाघाटीनंतर अंदाजपत्रकिय दराने<br>११.०००० % जास्त दराने<br>१०.००००% जास्त दराने |
| २. | 442612_1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध आरक्षणाच्या ताब्यात असलेल्या व येणाऱ्या जागांना, कुंपणभिंती बांधणे (वार्षिक निविदा)<br><br>मे. विकाश इंटरप्रायझेस<br><br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. एन.जे. ब्रदर्स | रु.१,३३,९२,८५७/-<br><br>२६.३००० % जास्त दराने दरवाटाघाटीनंतर अंदाजपत्रकिय दराने<br>२९.११००%जास्त दराने<br>३०.००००% जास्त दराने |
| ३. | 442616_1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील राई तलाव, जरीमरी तलाव, साईदत्त तलाव, सातकरी तलाव, गावदेवी तलाव, मोर्वा तलाव, नवघर जुना तलाव, राव तलाव, शिवार तलाव, एस.एन.कॉलेज समोरील तलाव, नास्का तलाव, गोडदेव, मांडली तलावातील मुर्ती विसर्जनासाठी वेगळी उपाययोजना करणे. | रु.२,८६,९१,५८१/-<br><br>१६.८८०० % जास्त दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मे. स्पार्क सिव्हील इन्फ्रा प्रोजेक्ट<br><br><br>मे. खुशबु इंटरप्रायझेस<br>मे. ओमकार इंजि ॲण्ड कॉन्ट्रक्टर्स | दरवाटाघाटीनंतर<br>१६.८८००% जास्त दराने<br>( सन २०१८-१९ च्या दरसुचीतील दराशी तुलना करता ६.१९ % कमी दराने)<br>१७.५००० %जास्त दराने<br>१८.०००० % जास्त दराने |
| ४. | 442777_1 | चेना गावाकडे जाणारा १८ मिटरचा विकास रस्ता व रस्त्यालगत गटर बांधणे. (मुलभुत सोई सुविधा विकास कामे)<br>मे. गजानन कंस्ट्रक्शन<br><br><br>मे. एम.एस. इंटरप्रायझेस<br>मे. राठोड ब्रदर्स | रु.३,५७,१३,८४६/-<br><br>२४.५०००% जास्त दराने<br>दरवाटाघाटीनंतर<br>१८.९६% जास्त दराने<br>( सन २०१८-१९ च्या दरसुचीतील दराशी तुलना करता अंदाजपत्रकिय दराने)<br>२७.४८०० % जास्त दराने<br>२९.५००० % जास्त दराने |
| ५. | 442618_1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व) केबिन रोड येथील पादचारी पुलावर सरकता जिना बसविणे. | रु.१,१२,२१,८७५/- |

| DESCRIPTION | QTY | UNIT | Miracle Electrical Solu. India Pvt.Ltd | Utility Ent. | New Filed |
|---|---|---|---|---|---|
| | | | RATE | RATE | RATE |
| ITEM NO.1<br>Design, manufacturing, supply, erection, testing and commissioning of escalators on FOB complete with all accessories and safety devices. | 1.00 | Nos | 6626953.00 | 7136719.00 | 7340625.00 |
| ITEM NO.2<br>Design, manufacturing, supply, erection, testing and commissioning of escalators foundation complete with all accessories and safety devices. | 1.00 | Nos | 4314375.00 | 4646250.00 | 4779000.00 |
| | | Total | 10941328.00 | 11782969.00 | 12119625.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | 442622_1 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अंतर्गत सजावटीचे, इतर पडलेली माती, साहित्य इ. उचलुन वाहतुक करण्यासाठी प्रभाग समिती निहाय मनुष्यबळ व डंपर इ.भाडयाने घेणे. (वार्षिक निविदा) (फेर निविदा) | रू.१,७८,५७,१४२/- |

| DESCRIPTION | QTY | UNIT | Ashapura Construction Company |
|---|---|---|---|
| | | | RATE |
| ITEM NO.1<br>Providing Pocklain | 1.00 | HOUR | 2244.00 |
| ITEM NO.2<br>Providing JCB Machine | 1.00 | HOUR | 1229.00 |
| ITEM NO.3<br>Providing Torras | 1.00 | SHIFT (8 HOURS) | 9114.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| ITEM NO.4<br>Providing Dumper | 1.00 | SHIFT (8 HOURS) | 6762.00 |
| ITEM NO.5<br>Providing Man Power | 1.00 | Per Labour / Per Day | 945.00 |
| Total | | | 20294.00 |

वरील पैकी कमी दरांच्या निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मान्यत देण्यात येत आहे, असा ठराव मांडत आहे.

**वंदना मंगेश पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय ह्या विषयावर आपले लक्ष वेधू इच्छितो ४८ नंबरचा जो विषय झालेला आहे त्याच्यामध्ये अनु.क्र. ६ मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील अंतर्गत सजावटीचे इतर माती, साहित्य उचलून वाहतूक करणेसाठी प्रभाग समिती निहाय मनुष्यबळ व डंपर भाड्याने देणे. साहेब आपल्या वार्षिक ज्या साफसफाईच्या दैनंदिन निविदा आहेत त्याच्यामध्ये समावेश आधीच आहे. रस्त्यावर पडलेली डेब्रीज त्यांनी उचलायचे आहे.

**राजीव मेहरा :-**

मा. सभापती महोदय मेरे को साहब ने फोर व्हिलर का रेट दिया ४५० रुपये फोर व्हिलर का पर मंथ मिरारोड में खूद २०१४ से दो हजार रुपये भर रहा हूँ। १२ घंटे का अभी गाडी में जाना ही बंद कर दिया वो मेहंगा पड रहा है।

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब हा जो विषय आहे तुमच्या दैनंदिन साफसफाईमध्ये डेब्रीजचा विषय आहे ना निविदेमध्ये तो विषय आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो तो विषय वेगळा आहे. आमचा दैनंदिन साफसफाई घनकचऱ्याचा विषय आहे. घनकचरामध्ये डोअर टू डोअर कलेक्शन ऑफ सॉलिड म्युन्सिपल सॉलीड वेस्ट डेब्रीज वैगेरे येत नाही. ह्यासाठी डेब्रीज सी.एन.डी. कन्स्ट्रक्शन ॲन्ड डिमोलेशन आणि डेब्रीज त्यासाठी बांधकाम विभागाने स्वतंत्र काढले आहे. ते बांधकाम विभागाचे आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**

पानपट्टे साहेब हमारे यहाँ बॉम्बे का भी कचरा मिरा भाईंदर में डालना चालू किया क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अपनी गाडी खराब थी इसलिए बॉम्बे की कुछ गाडी थी।

**श्रीप्रकाश सिंह :-**

कितनी गाडी।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

४२ गाडी.

**श्रीप्रकाश सिंह :-**

इतनी गाडी खराब थी आपने गाडी बॉम्बे से लिया मुंबई महापालिका से...................

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मुंबई महापालिका से नही ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट।

**श्रीप्रकाश सिंह :-**

तो उस गाडी के उपर मुंबई महापालिका क्यों लिखा है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मैं नाम चेंज करने के लिए बोला।

**श्रीप्रकाश सिंह :-**

वहाँ जो गाडी रिजेक्ट हुआ है वो स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर के लिए चला रहे है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

रिजेक्ट नही अच्छी गाडी है काम चल रहा है।

**श्रीप्रकाश सिंह :-**

काम चला रहे है का क्या मतलब है। हम लोग धक्का मारके पालिका चला रहे है क्या? परसो आपने बहुत बडा प्रोग्राम किया आधे नगरसेवक को मालूम है आधे नगरसेवक को मालूम नही?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वह कार्यक्रम पदाधिकारी और सफाई कामगार के लिए कार्यक्रम था।

**श्रीप्रकाश सिंह :-**

ठीक है तो आप स्वच्छ सुंदर मिरा भाईंदर आप कर रहे है तो जिधर से भंगार मिलेगा उधर धक्का मारके काम करने का क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ऐसा नही है आप बताओ मैं देखता हूँ।

**श्रीप्रकाश सिंह :-**

आपको मालूम नही है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जनरल स्टेटमेंट का कूछ फायदा नही होता कौनसी गाडी खराब थी वह बताओ।

**श्रीप्रकाश सिंह :-**

आप जो गाडी मंगाई है ना...................

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

खराब गाडी चलती नही आप ऐसा कैसे बोलते हो।

**श्रीप्रकाश सिंह :-**

कमिशनर का गाडी खराब हो गया तो आप मुंबई महापालिका का गाडी लाके चलाऐंगे क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब वह ग्लोबल का टेंडर है।

**श्रीप्रकाश सिंह :-**

कौनसा ग्लोबल का टेंडर।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वेस्ट मॅनेजमेंट का टेंडर है उसकी जिम्मेदारी है कौनसी गाडी लेने का खूद की गाडी है।

**श्रीप्रकाश सिंह :-**

